२ जून १९६८ । चाळीस पैसे

# माणूस

## कम्युन्स, ग्रामराज्ये वगैरे



समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : चौथा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक :
दिलीप माजगावकर,
सौ. निर्मला पुरंदरे

स न. जून, १०

जून १ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या 'बावला' खून खटल्यात 'शफी महंमद, पुष्पशील पोंदे व शामराव दिघे या तिघांना फासावर लटकवण्यात आले' असे लिहिले आहे. या वृत्तामध्ये माहितीअभावी एक चूक आहे पुष्पशील पोंदे यास फाशीची सजा झाली हे खरे. पण शिक्षा झाल्यानंतर काही तांत्रिक व कायदेशीर अडचणी पुढे आल्या. त्याच्यामध्ये वेडेपणाची चिन्हे दिसू लागली. तेव्हा वेड बरे होईपर्यंत फासावर चढवणे कायदेशीर नव्हते. त्यामुळे त्याला जेलमध्ये ठेवण्यात आले. पुढे १९२९ मध्ये त्याचे वेड सुधारले व काही कारणाने त्याला माफी मिळून सोडण्यात आले. तो होळकर घराण्याचा नजीकचा नातेवाईक होता. नंतर तो जर्मनीला गेला व dentistry चा अभ्यास करून परत इंदोरला आला तिथेच याने दवाखाना सुरू केला.

१९३७ व १९४२ या साली मला इंदोरला जाण्याचा योग आला असताना मी त्याला भेटलो होतो. नंतरची मात्र मला माहिती नाही

**एक वाचक, मुंबई.**

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कथित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# पुन्हा तीच संध्याकाळ

'फ्रान्समधील घटनांची भारतात पुनरावृत्ती होणार नाही ' असे कॉंग्रेस महा-समितीच्या अधिवेशनात अस्वस्थचित्त सभासदांना मोरारजीभाई देसाई छातीठोकपणे सांगत आहेत.

'राज्यकर्त्यांनी येथील असंतोषाची, वैफल्याची दखल घेतली नाही, तर पॅरीस काही दूर नाही,' असा कॉम्रेड मिरजकर यांचा एका जाहीर सभेतील इशारा आहे.

दि. के. बेडेकरांच्या गच्चीवर, एका संध्याकाळी मी आणि काही मार्क्सवादी विद्यार्थी, पॅरीसमध्ये नेमके घडले तरी काय याचा कसून शोध घेण्याचा मन:पूर्वक प्रयत्न करीत आहोत.

'विद्यार्थ्यांनी दंगली केल्या, कामगारांनी संप पुकारले–यापेक्षा फ्रान्समध्ये या वेळी एक वेगळी घटना बऱ्याच प्रमाणात घडलेली दिसते–ती कोणती ?' मी विद्यार्थ्यांना खोदून खोदून हा प्रश्न विचारीत आहे.

बऱ्याच वेळानंतर, एक अगदीच कोवळया वयाचा तरुण मला सांगत आहे, " कम्युन्स ! फ्रान्समधील विद्यार्थ्यांनी आणि कामगारांनी या वेळी बऱ्याच ठिकाणी ' कम्युन्स ' स्थापन केलेली आहेत. "

मला हवे ते उत्तर मिळते. माझा पुढचा प्रश्न असतो–

' कम्युन्स 'चा अर्थ काय ? '

मला चटकन उत्तर मिळतं–' सर्व समाईक मालकीचं. '

' एवढाच ' कम्युन्स 'चा अर्थ असेल तर अशी ' कम्युन्स ' आपल्याकडेही सर्वोदयवाद्यांनी पूर्वीच स्थापन केलेली आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील काही गावांतून अशी व्यवस्था आजही आहे. खाणे-पिणे-राहणे सर्व सामायिक. कोणाची कशावरच मालकी नाही. मग ही सर्वोदयाची ' ग्रामराज्ये ' आणि पॅरीसची ' कम्युन्स ' यांत काही साम्य तुम्हांला आढळते का ?' मी.

' मुळीच नाही. सर्वोदयाचे विचार अगदी जुनाट आहेत. ग्रामराज्ये म्हणजे औद्योगिक क्रांतीपूर्वीची जुनी व्यवस्था टिकवून धरण्याची दुबळी धडपड आहे. ' विद्यार्थी.

" चीनमध्ये औद्योगिक क्रांती पूर्णत्वाला पोचली नसताना व साम्यवादी क्रांती

खूप दूर असतानाच माओने ' कम्युन्स 'चा प्रयोग केला." मी.

' चीनमध्ये भांडवलशाहीचा नाश केल्यानंतर हे प्रयोग माओने केले म्हणून ते यशस्वी ठरले. विनोबाप्रणीत ग्रामराज्ये म्हणजे कावळयाच्या छत्र्या वाटतात. त्या टिकणाऱ्या नाहीत.' विद्यार्थी.

' चीनमध्ये माओलाही कम्युन्सचा प्रयोग थांबवावा लागला असे माझ्या वाचनात आलेले आहे आणि पॅरीसमध्ये स्थापन झालेली ही कम्युन्स तरी किती दिवस टिकणार आहेत अशी तुमची कल्पना आहे ? अशी कम्युन्स शंभर वर्षांपूर्वीही पॅरीसमध्ये स्थापन झाली होती व काही दिवसांतच ती कोलमडूनही पडली होती. तरीही मार्क्स–लेनिन यांना या ' कम्युन्स 'चे विलक्षण आकर्षण वाटत होते. किबहुना ' कम्युनिझम ' हे ध्येय म्हणून युरोपात पुढे आले ते अशा तुरळकपणे उगवलेल्या कावळयांच्या छत्र्यांमुळेच, हेही आपण विसरता कामा नये. ध्येय म्हणून कम्युनिझमचा शोध मार्क्सने लावलेला नाही. हा शब्द, हे स्वप्न मार्क्सपूर्वकालीन आहे. मार्क्सने हे स्वप्न कम्युन्सच्या अपयशी व तुरळक प्रयोगातूनच उचलले आणि ते सत्यसृष्टीत उतरवण्याचा मार्ग मात्र नवा सांगितला– शास्त्रीय समाजवाद. तेव्हा आपल्याकडील ग्रामराज्ये तुरळक, अपयशी व जुनी म्हणून टाकाऊ का ठरावीत ?' मी.

' मार्क्सने जसा खाजगी मालकीहक्काचे विसर्जन हा कम्युनिझमकडे जाण्याचा मार्ग सांगितला तसे विनोबांचे सांगणे कुठे आहे ?' विद्यार्थी.

" सब भूमी गोपालकी ' या विनोबांच्या घोषणेचा अर्थ काय ? घोषणा देऊनच विनोबा थांबले नाहीत, त्यांनी भूदान–ग्रामदानाचा मार्गही दाखवून दिला. ' मी.

" भूदान–ग्रामदान तर साफ फसले आहे. टाकाऊ जमीनी जमीनमालकांनी विनोबांना ' दान ' म्हणून दिल्या आणि त्यांची फसवणूक केली." विद्यार्थी.

" हे व्यावहारिक अपयश झाले आपण तात्त्विक बाजूचा विचार करीत आहोत. विनोबांचा ' दान ' या शब्दाचा अर्थ ' संविभागः '– समान वाटप–असा आहे. ' कम्युन्स ' कोसळली; भूदान, ग्रामदान, ग्रामराज्ये ही कोसळण्यासाठीच आहेत असे समजू. प्रश्न आहे तात्त्विक सारखेपणाचा."

" ' कम्युन्स ' आणि ' भूदान–ग्रामदान–ग्रामराज्ये ' यांत काही सारखेपणा असेलही. पण तो फार थोडा व दुर्लक्षणीय आहे." विद्यार्थी.

' डाव्या पक्षांनी या चळवळीकडे लक्ष पुरविले असते तर तो तसा ' थोडा ' व ' दुर्लक्षणीय ' राहिला नसता असे नाही का तुम्हांला वाटत ? माओने एके ठिकाणी म्हटले आहे की भूमीचा प्रश्न सुटल्याशिवाय हिंदुस्थानचे– सर्वच मागासलेल्या देशांचे–कुठलेच प्रश्न सुटू शकणार नाहीत. विनोबांनी हा मूलभूत भूमिप्रश्न हाती घेतला. भूमिहीनांच्या प्रश्नाकडे साऱ्या देशाचे लक्ष वेधले. खऱ्या अर्थाने भारतीय

मजूरचळवळीचा पाया घातला. कारण आजही वर्षातून सहा महिने अर्धपोटी आणि वर्षभर अर्धवस्त्र असणारा आपल्याकडील आदिवासी–हरिजन–भूमिहीन हाच मजूरसमाजाचा खरा तळ आहे आणि तो विनोबांनी ढवळून काढला आहे. दहा–बारा वर्षांपूर्वीच्या तेलंगण लढ्याने आणि कालपरवाच्या नक्षलबारी उठावाने तरी यापेक्षा अधिक काय साधले आहे ? हे दोन्ही प्रयोग व्यावहारिक अर्थाने तर पूर्ण फसलेलेच आहेत. तरीही भूमीहीनांचे लढे म्हणून मार्क्सवादी त्याकडे पाहतात. तसेच विनोबांच्या आंदोलनाकडे पाहिले गेले असते तर येथल्या परिस्थितीशी मिळता–जुळता असा एखादा नवा पर्याय पुढे येण्याची शक्यता होती.' मी

'भूदान प्रयोग यशस्वी ठरला असता तर मार्क्सवाद्यांना आनंद वाटला असता. पण तरीही तो उचलून धरून यशस्वी करावा असे त्याचे मोल अजूनही पटत नाही.' विद्यार्थी.

कोणाला त्याचे मोल पटो, ना पटो मला मात्र फ्रान्समधील कम्युन्सच्या प्रेरणा आणि आपल्याकडील गांधी–विनोबांच्या ग्रामराज्यप्रेरणा यांमध्ये समानतेचे एक सूत्र सारखे जाणवत आहे. 'समाईक मालकी' ही आज फ्रान्समध्ये उगवलेल्या व काही दिवसांतच मावळणाऱ्या 'कम्युन्स 'मागील प्रेरणा आहे असे मला वाटत नाही. तशी समाईक मालकीची व्यवस्था तर इस्राईलमध्ये 'किबुत्स 'च्या रूपाने आजही अस्तित्वात आहे व तिथे ती चांगली स्थिरपदही झालेली आहे. फ्रान्समध्ये विद्यार्थ्यांनी व कामगारांनी स्थापन केलेली 'कम्युन्स ही समाईक मालकीच्या तत्त्वापेक्षाही स्वयंशासनाचा आग्रह व्यक्त करण्यासाठी स्थापन केली असावीत, असे मला वाटते. 'आमच्या जीवनावर परिणाम करणारे निर्णय आजच्या समाजव्यवस्थेत आम्हांला न कळत, आम्हांला अनाकलनीय असणाऱ्या व्यक्ती व यंत्रणेकडून घेतले जात आहेत. ही निर्णयव्यवस्था त्यामुळे आम्हांला परकी व निर्जीव वाटत आहे. या निर्णयव्यवस्थेत आमचाही काही वाटा, काही सद्भाग असल्याशिवाय आम्हांला ती आपलीशी व जिवंत वाटणार नाही' – ही विद्यार्थी कामगारांची व्यथा आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी केवळ दंगली माजवून स्वस्थ न राहता शिक्षण संस्थांतून आपला कारभार सुरू केला, कामगारांनी संपाच्या पलीकडे जाऊन कारखान्यांची यंत्रणा ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. हे खाजगी मालकीच्या कारखान्यांत घडतेच. तसेच समाजवादाचे बालेकिल्ले समजले जाणाऱ्या सरकारी मालकीच्या कारखान्यातही घडले. फ्रान्स–जर्मनी या भांडवलशाही देशात जशी ही प्रवृत्ती उफाळून व्यक्त झाली तशीच ती युगोस्लाव्हिया, झेकोस्लोव्हाकिया या कम्युनिस्ट देशांतही व्यक्त केली गेली. आपण एका निर्जीव व अजस्र यंत्रणेचे गुलाम बनलो आहोत अशी ही सार्वत्रिक अगतिकता होती आणि 'कम्युन्स' हा या अगतिकतेचा विधायक उद्रेक होता. हुकूमशाहीमध्ये – मग ती डावी असो की

उजवी असो ही अगतिकतेची, परकेपणाची भावना परकोटीला पोचते, म्हणून तेथील उद्रेकांचे स्वरूपही जहाल राहते. परंतु लोकशाही देशांतही सर्वसामान्य नागरिकाला हा स्वयंशासनाचा प्रत्यय येईनासा झाला असल्याने तेथील जनतेत अराजकाचे आकर्षण वाढीस लागले आहे फ्रान्समधील उठावाच्या कितीतरी अगोदर इंग्लंडमधील विचारवंत 'लोकशाहीचा साचा बदला, नाहीतर ती टिकणार नाही,' असे प्रतिपादन करू लागले होते. आजच्या मजूर मंत्रिमंडळातील एक मंत्री व प्रख्यात मजूर नेते वेजवुड बेन यांनी शासनकर्ते, शासनव्यवस्था आणि जनता यांच्यामधील दुरावा हेच फ्रान्समधील उद्रेकाचे कारण आहे असे सांगून इंग्लंडमध्येही लोकशाही व्यवस्थेत काही मूलगामी बदल केले नाहीत, सर्वसामान्य नागरिकाला त्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या निर्णयात सहभागी होण्याची संधी आपण प्राप्त करून दिली नाही, तर परिस्थिती असुरक्षित आहे असा आपल्या सहकाऱ्यांना जाहीर इशारा दिला आहे. अमेरिकेतील परिस्थिती तर याहीपेक्षा असुरक्षित आहे. 'Wanted : Relevance and Involvement –' (अर्थपूर्णता हवी, आत्मीयता हवी) अशी तिकडची मागणी आहे. मॅनहॅटनचे प्रसिद्ध कोलंबिया विद्यापीठ नुकतेच काही काळ विद्यार्थ्यांच्या ताब्यात होते.

लोकशाहीच्या माहेरघरात हे धक्के जाणवत असताना आपल्या नकली लोकशाहीतले मोरारजींसारखे नेते जेव्हा 'तसे काही हिंदुस्थानात घडणार नाही' म्हणत डोळ्यावर कातडे ओढून घेतात, तेव्हा या मनःशांतीचे कौतुक वाटल्यावाचून राहात नाही.

आणि मिरजकर जेव्हा आपल्या राज्यकर्त्यांना पॅरीसचे इशारे देतात तेव्हा आपली क्रांतीही किती नकली आणि अनुकरणग्रस्त आहे याचा नकळत ते एक पुरावा देऊन जातात, असेही जाणवल्यावाचून राहात नाही.

अरे ! स्वयंशासनाचा आग्रह हा तर आपल्याकडील ग्रामराज्यकल्पनेचा मुख्य विशेष नाही का ?

– श्री. ग. मा.



# आस्वाद

" बंदऊँ गुरु पद कंज कृपा सिंधु नररूप हरि ।
महामोह तम पुंज जासु बचन रबि कर निकर ।।
बंदऊँ गुरु पद पदुम परागा । सुरुचि सुबास सरस अनुरागा ।।
अमिअ मूरिमय चूरन चारु । समन सकल भव रुज परिवारू ।।
सुकृति संभु तनु बिमल बिभूती । मंजुल मंगल मोद प्रसूती ।।
जन मन मंजु मुकुर मल हरनी । किएँ तिलक गुन गन बस करनी ।।
श्रीगुर पद नख मनि गन जोती । सुमिरत दिव्य दृष्टि हियँ होती ।।
दलन मोह तम सो सप्रकासू । बडे भाग उर आवइ जासू ।।
उघरहिं बिमल बिलोचन ही के । मिटहिं दोष दुख भव रजनीके ।।
सूझहिं राम चरित मनि मानिक । गुपुत प्रकट जहँ जो जेहि खानिक ।।
जथा सुअंजन अंजि दृग साधक सिद्ध सुजान ।
कौतुक देखत सैल बन भूतल भूरि निधान ।।
गुरु पद रज मृदु मंजुल अंजन । नयन अमिअ दृग दोष बिभंजन ।।
तेहिं करि बिमल बिबेक बिलोचन । बरनउँ राम चरित भव मोचन ।। "

महाकवी तुलसीदास या हिंदी कवीच्या 'रामचरितमानस' या ग्रंथातील बालकांडात जो गुरुचरणांचा महिमा वर्णिला आहे, त्याचे अनन्य सुंदर दर्शन या दोह्यांमधून घडले आहे. सद्‌गुरूंची थोरवी इतकी महान असते की, त्यांच्या चरणांच्या केवळ दर्शनाने अथवा त्यावरील रजःकण मस्तकी धारण केल्याने कोटी कोटी पापांचे क्षालन आणि लक्ष लक्ष जन्मांचं तारण होतं. किंबहुना सद्‌गुरूंची एकदा कृपा झाली की, 'याचि देहि याचि डोळा' भवसागर पार करता येतो. जीवाला मुक्ती मिळते.

म्हणून सद्‌गुरूंचे वर्णन करताना संत तुलसीदास गुरूच्या चरणांना सद्‌भावाने नमस्कार करतात. गुरू म्हणजे मनुष्यरूप धारण केलेला साक्षात ईश्वरच असतो. अर्थातच तो कृपेचा अफाट सागर असतो. त्याच्या वचनांनी मोहरूपी दाट अंधार क्षणात नाश पावतो. त्याचे बोलणे म्हणजे अशा मोहतमाला नष्ट करणारे जणू सूर्यकिरणच असतात.

सद्‌गुरूंचे चरणकमल तर पवित्र असतातच परंतु त्यावरील धुलीकणसुद्धा प्रेम-

रसान परिप्लुत आणि सुगंधी असल्यामुळ भक्त तुलसीदास त्यांनाही वंदन करतात. समस्त भवरोगांचा नाश करून जीवाला अमरत्व प्राप्त करून देणाऱ्या संजीवनी मुळीचे चूर्णच असे हे रज:कण, पुण्यवान पुरुषरूपी शिवाच्या शरीरावर निर्मळ विभूतीच्या रूपाने शोभून दिसतात. त्याच्या दर्शनाने जिवाचे कल्याण होते. त्याला असीम आनंदाची प्राप्ती होते. त्या चरणधुळीने भक्ताच्या मनोदर्पणावर जी पुटं चढलेली असतात, ती निघून जाऊन मन निर्मळ, निरागस बनतं. ती धूळ जर मस्तकी धारण केली तर सर्व सद्गुणांचा आपल्या ठायी वास होतो.

श्रीगुरूंच्या चरणांच्या नखांचासुद्धा महिमा अपूर्व आहे, असे तुलसीदास निग्रहाने सांगतात. गुरूंच्या चरणांच्या नखांची प्रभा देदीप्यमान मण्यांच्या प्रकाशासारखी विलसत असते. त्यांचे नुसते स्मरण जरी केले तरी हृदयात दिव्य दृष्टी उत्पन्न होते. त्या नखांच्या मोहक द्युतीने अज्ञानरूपी अंधाराचा नाश होतो. ज्यांच्या हृदयात तो प्रकाश येतो ते खरोखरच भाग्यवान आहेत. कारण त्यामुळे भावनांची दृष्टी उघडते, जागृत होते. संसाररूपी रात्रीतील सर्व दोषांचा तद्वत दु:खांचा निरास होतो आणि श्रीरामचरित्ररूपी माणिक गुप्त वा प्रकट कोणत्याही स्वरूपात असले तरी ते दृष्टीस पडते.

सद्गुरूंच्या चरणधुळीचे अलौकिकत्व वर्णन करताना पुढे श्री. तुलसीदास म्हणतात—की ज्याप्रमाणे साधक, सिद्ध आणि ज्ञानी लोक आपल्या नेत्रात सिद्धांजन घालून पर्वत, अरण्य आणि भूगर्भात अगदी विस्मयजनक अशा खाणी पाहतात, त्याचप्रमाणे श्रीगुरूंच्या पावलांचे रज:कण हे जणू आपल्या भौतिक दृष्टीतील दोषांना घालविणारे नेत्रांजनच आहे. असे हे दिव्य अंजन नेत्रात घालून संत तुलसी-दास आपल्या विवेकरूपी डोळ्यांना, म्हणजेच आपल्या विवेकदृष्टीला निर्मळ करून संसाराच्या बंधनातून मुक्त करणाऱ्या श्रीरामचरित्राचे वर्णन करू इच्छितात.

संत तुलसीदास एक भावुक भक्त होते. गुरुमहिमा वर्णन करताना त्यांच्या चरणांची अपूर्वाई आणि दिव्यत्व यांचे अत्यंत भावनिर्भर दर्शन त्यांनी आपल्या या दोह्यांत घडविले. गुरूंचे चरण म्हणजे त्यांची नखे, त्यांवरील धूळ हीसुद्धा किती पवित्र असते, हे तुलसीदासांनी परोपरीने पटवून दिले. सामान्य मनुष्यालाही समज-तील अशा साध्या उपमांनी अगदी स्वच्छ भाषेत तुलसीदास गुरूंच्या चरणांची अगाधता वर्णन करतात. त्यामुळे सर्वसामान्य वाचकालाही अगदी सहजतया गुरु-चरणांचे महत्त्व पटते. व्रजभाषेसारख्या गोड भाषेत कोमल पदबंधनांनी सद्गुरूंचा केलेला हा गौरव भक्ताच्या मनात प्रेमभावनेचा गोडवा भरून गुरूविषयी आदराची, आपुलकीची आणि भक्तीची भावना निर्माण करतो. भक्ताचे हृदय असीम भक्ति-भावनेने भारावून जाते आणि तुलसीदासांची ही कोमलकांत पद्यरचना अखंडपणे हृदयात रुंजी घालत राहते ! □

—रसिक



राजश्री / शम्मीकपूर

पुष्कळ वर्षांमागे—म्हणजे अगदी शाळकरी वयात—'ब्रह्मचारी' नावाचा एक खुसखुशीत चित्रपट मी चोरून पाहिला. त्या खेळाला अपघाताने, घरी आलेल्या पाहुण्यांबरोबर वडील वरच्या दरात बसले होते आणि मी पिटात जीव मुठीत धरून होतो. पुढे तोच चित्रपट वयाच्या तिशीत पाहण्याची संधी आली आणि तो मला अधिकच आवडला. तांत्रिकदृष्टया तो जुनाट वाटत होता पण तरीही टवटवीत होता. 'ब्रह्मचर्य हेच जीवन', 'जंगले वाढवा' असले त्यात थट्टेचा विषय केलेले संदेश आता काळाबरोबर वाहून गेले आहेत, पण आपण पैज लावतो, अजूनही त्या चित्रपटाची एखादी धडकी प्रत कुठे दाखवली गेली तर ती प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन करू शकेल. त्यातला तो औदुंबर नामे नायकाचा ब्रह्मचर्याच्या

## रातराणी — विजय तेंडुलकर

# २ ब्रह्मचारी

## एक हंस
## एक कावळा

तारुण्यसुलभ तत्कालीन नादाने पुरता झपाटलेला गोल, निरागस, हसरा चेहरा अजून आठवतो. त्याचे माकड, सुक्या मेव्याची हातगाडी, उघडयाबंब वातुळ अंगाने जोर बैठकांचा हमामा, आणि सर्वांत मजेशीर म्हणजे 'यमुनाजळी' दोन वेण्यावाल्या एका फटाकडया किशोरीच्या प्रेमात बघता बघता आणि सपशेल पडणे– सारेच अवीट.

या मराठी 'ब्रह्मचारी'च्या पार्श्वभूमीवर याच नावाचा हिंदी 'ब्रह्मचारी' लागलेला पाहून आपली उत्सुकता नाही म्हटले तरी उगीच चाळवली. वस्तुतः

**त्या जुन्या अवीट 'ब्रह्मचारी'चे आणि या रंगीत संगीत देमार 'ब्रह्मचाऱ्या'चे काहीही नाते नाही. अमेरिकेतले केनेडी आणि मुंबईतला केनेडी ब्रिज, लेखक-दिग्दर्शक विश्राम बेडेकर आणि मसालेवाले बेडेकर, यांच्याप्रमाणे फक्त नाम-मात्रच संबंध.**

जुन्या गाजलेल्या शीर्षकांचे नवे बाजारू, निकृष्ट चित्रपट काही सध्या कमी निघत नाहीत. त्यातले कुठे काय आपण पाहायला जातो ? तुकाराम झाला, ज्ञानेश्वर झाला, आदमी झाला, दुष्मन झाला, आणखी अर्धा डझन झाले. निदान मी तरी यांतल्या एखाद्याच्या वाटेला गेलो नव्हतो. पण 'ब्रह्मचारी'ने का, कशी कोण जाणे, उत्सुकता चाळवली खरी आणि त्यात पाहावे तेव्हा थिएटरवर 'हाऊस फुल्ल'चा फलक ! हा एवढा लोकप्रिय नवा ब्रह्मचारी आहे तरी कसा ते पाहण्याचे मनाने घेतले. आणि धाडसाने मी हा उपक्रम नुकताच अमलातदेखील आणला.

हा 'ब्रह्मचारी' मोठाड अंगाचा आणि जंगली हावभाव आणि आरडाओरडा करणारा आहे. कित्येकदा तो ओरँगउटँगचा नातलग वगैरे वाटतो तर मधूनच वेडयांच्या इस्पितळातला तहहयात रहिवासी भासतो. तुमच्याआमच्यासारखे याचे काही नाहीच. सगळेच विक्षिप्त, रानदांडगे. हा 'ब्रह्मचारी' आहे केवळ नाममात्र,

२२ जून १९६८

इंग्रजीत 'बॅचलर' म्हणतात त्या अर्थाने—म्हणजे याला बायको नाही म्हणून हा ब्रह्मचारी. बाकी याचे वागणे इरसाल. सुंदर बाईवर सतत एक डोळा. नाच-गाण्यात आणि पियानो—बियानो वाजवण्यात हा वाकबगार. पियानो वाजवून फक्त प्रेमगीतेच म्हणण्याची—चुकलो, ओरडण्याची—याची स्पेशालिटी.

याला बायको नाही कारण अनाथ—बालकाश्रमासारखे काहीतरी हा चालवतो; त्यापुढे लग्न करण्याला याला सवड नाही. अनाथ बालकाश्रमाची कल्पना याला सुचावी यामागे त्याचे स्वतःचे अनाथ बालपण आहे. असे तो एका प्रसंगात भयंकर भावनावश चेहरा करून सांगतो. याच्या अनाथाश्रमातील पोरे याच्याचसारखी डामरट आणि आगाऊ आहेत. डोळे घालण्यापासून कमरा हलवून वाह्यात नृत्ये करण्यापर्यंत सर्व काही त्यांना येते. 'आश्रमा'च्या कोनाड्यात बुद्ध—गांधी—टिळकांचे पुतळे ठेवून ही मंडळी प्रत्यक्षात या रंगीत—संगीत वातावरणात जगतात. चरितार्थासाठी एका शेटियाला, त्याच्या मालकीच्या जागेला गिऱ्हाईक येऊ नये म्हणून गोंगाट करून नाडतात. एका संपादकाला आश्रमातल्या अवलाद पोरांचे प्रेक्षणीय फोटो छापण्यासाठी पुरवणे हाही आश्रमाच्या जंगली गुरुजींचा एक उद्योग असतो. मुले नको असलेल्या आया आश्रमाबाहेरच्या पाळण्यात तान्हे मूल ठेवून जातात; मूल पाळण्यात आले की आश्रमात लाल बत्ती लागते. की लगेच ते आश्रमवासीय अल्पवयीन आगाऊंच्या वानरसेनेत भरती करून घेण्यात येते.

होते काय की संपादक फोटो छापण्याचे थांबवतो. आश्रमाच्या ताड—माड संचालकांसमोर चिंता उभी राहते. एक खरोखरी खळबळजनक फोटो कसाही घेऊन ये, तुला पाचशे रुपये देतो अशी 'ऑफर' संपादक देतो आणि जंगली गुरुजी कॅमेऱ्यासकट भटकंतीला निघतात. एक तरुणी समुद्रात जीव देताना दिसते. तिचा फोटो ते काढतात. पण या घाईत ती तरुणी मागे लागून आश्रमात पोचते. तिचे लग्न ठरून फिस्कटलेले असते. बड्या घरच्या वाग्दत्त वराने आयत्या वेळी साफ नकार दिलेला असतो. आता त्याच वराशी तिचा विवाह लावून देण्याची प्रतिज्ञा, प्रतिज्ञा खरी झाल्यास वीस हजार रुपये तिने द्यावेत या अटीवर जंगली गुरुजी करतात आणि या नव्या उद्योगामागे आपल्या 'दे धडक' पद्धतीने लागतात. त्या गावरान तरुणीची उच्चवर्गीय उंची 'परी' बनवतात. तिची आणि त्या वरमहाराजांची गाठ घालून देतात. पण हा वर असतो प्रत्यक्षात बायका गटवून चैन करणारा आणि जबाबदारी येऊ बघताच हात झाडून मोकळा होणारा पाजी खुशालचेंडू. हे लक्षात येताच नायिका शुद्धीवर येऊन त्याला झिडकारते आणि तिच्या प्राप्तीसाठी हा प्रतिष्ठित माथेफिरू नायकाविरुद्ध अनेक देमार उपद्व्याप करतो. अनाथाश्रमावर भर पावसात टाच काय आणवतो, अनाथाश्रमाची पोरे गाडीत भरून गाडी धावत्या आगगाडीपुढे काय आणून उभी करतो— या सर्व उपद्व्यापात अर्थातच नायक त्याला अखेरच्या क्षणी पोचून नामोहरम करतो. खलनायक भरपूर मार

खाऊन शेवटी शरण येतो. नायकाची जीत होते. नायिका नायकाला मिळते. ब्रह्मचारी आश्रम या पाटीवरचे ब्रह्मचारी एक इब्लिस पोर खडूने खोडते. रंगीबेरंगी उघडयाबोडक्या मोटार गाडीत पोरे, कुत्रे, बायको असे सर्व भरून जंगली गुरुजी आपले हातखंडा जंगली गाणे ओरडत निघतात आणि हा हिंदी 'ब्रह्मचारी' संपतो.

यात खलनायकाची अवांतर लफडी, दोन मामटयांच्या आणि एका टॅक्सी ड्राव्हरच्या लीला, दोन मानगडींची लग्ने उघळणे असले कथानकाशी निमित्तमात्रदेखील संबंध नसलेले किंवा फार तर तेवढाच संबंध असलेले सनसनाटी प्रकार मिळवा आणि अर्थात तद्दन परकी चालीवरची नाचगाणी. थोडक्यात, बहकलेल्या ब्रह्मचाऱ्याच्या मनोव्यापारांसारखा, हा शंभर टक्के व्यापारी हेतूने तयार केलेला मसालेदार 'ब्रह्मचारी', कुठेही कसाही भरकटत जातो आणि 'आता अधिक काही उरले नाही' अशा टप्प्याला पोट फुटेस्तोवर अरबटचरबट खाऊन आलेल्या ढेकरासारखा संपतो.

कुठे तो हृद्य, खुमासदार, समाजातल्या खुणांवर गुदगुल्यांसारखी दिलखुलास आणि मार्मिक टीका करणारा सौम्य-प्रकृती पण हास्यस्फोटक 'ब्रह्मचारी' आणि कुठे हा आफ्रिकेतून आयात केल्यासारखा वाटणारा रानवट, कर्कश, दिशाहीन, अस्ताव्यस्त आणि बिनबुडाचे एक खोटे जीवन दाखविणारा ब्रह्मचारी! तो ब्रह्मचारी 'हंस' तर हा 'कावळा!'

दोहोंत तुलना मनात येणे म्हणजेसुद्धा त्या 'ब्रह्मचाऱ्या'वर अन्याय आहे असे वाटले. पण करायचीच तर त्या 'ब्रह्मचारी'त नायिकेचा त्या काळात खळबळजनक असा पोहण्याचा पोशाखसुद्धा कसा अंगभर होता; तर या नव्या 'ब्रह्मचारी'त दुय्यम नायिकेचा सार्वजनिक समारंभातला पोशाख तिची नामी दाखवीत होता. त्या 'ब्रह्मचारी'त माकडदेखील सभ्य होते; तर इथे प्रौढ माणसे माकडांहून असंस्कृत आणि आचरट होती; मग पोरांचे विचारूच नका.

## पोरटयांचा हिस्सा

तरीही प्रेक्षक या नव्या 'ब्रह्मचारी'वर खूष दिसत होते. 'ये:!', 'बक्अप्', 'याहू' असल्या उत्स्फूर्त उद्गारांचा वर्षाव चालू होता. शिट्टया, टाळ्यांचा गजर चालू होता. तर्कविसंगत वाटेल तेवढया गोष्टी कसल्याही खुलाशाविना खपवून घेतल्या जात होत्या. त्याचे मुख्य कारण हा मसालेदार 'ब्रह्मचारी' कुठेही सहसा रेंगाळत नव्हता. मनमानी, वेडया का होईना पण उडया मारीत हा बहुतेक वेळ धावत होता. प्रेक्षकांना हसविणाऱ्या आणि रडविणाऱ्या प्रसंगांची एक उतरंड रचण्यात दिग्दर्शक मप्पी सोनी पुष्कळच यशस्वी झाले होते. शेवटच्या पाठलाग–हाणामारीच्या भागाने तर – वस्तुत: त्याआधीच चित्रपट संपल्यासारखा असताना– प्रेक्षकांना बेहोष केले. हिंदी चित्रपट–शौकीनांच्या भक्तीचा विषय असे, शम्मी कपूर, प्राण, मुमताज, धुमाळ, राजश्री या चित्रपटात असल्यानेही पडद्यावर जे

येईल ते गोड करून घेण्याच्या घाईतं बहुतेक प्रेक्षकवर्ग होता. त्यात हा चित्रपट रंगीत; ईस्टमनकलरमधला. क्वचित आभाळ जांभळे दिसले तरी या रंगकामाचाही काही प्रभाव होताच. परंतु सगळ्यात या चित्रपटाचे सामर्थ्य म्हणजे त्यातली पोरे. अशी पोरे एकत्र सहसा भेटणे कठीण ! एक, दोन दातांमधल्या फटीत जीभ घालून बोलणारे, तर एक जाड भिंगांचा चष्मा लावून नकोत ते प्रश्न विचारणारे, एक चिनीमकाव चेहऱ्याचे तर दुसरे सारखी सुटणारी चड्डी वर खेचून खसखस पिकविणारे – असे एकूण बारा प्रकार. ही सारी चित्रविचित्र पोरे स्वतंत्रपणे तर वेधक आहेतच; पण एकत्रितपणे या चित्रपटभर त्यांनी केलेला गोंगाट, घातलेला धुमाकूळ, पसरलेली भोकाडे आणि दाखविलेले पराक्रम अक्षरश: अचाट आहेत. दिग्दर्शक भप्पी सोनींनी यांच्याकडून करवून घेतलेल्या या साऱ्या कृती अनेकदा वाह्यात आणि आगाऊ आहेत, अनेकदा प्रेक्षकाच्या डोळ्यांत दोन–चार अश्रू आणण्यासाठी या पोरांना त्यांनी चक्क 'वापरले' आहे– तरीही एक खरे की या 'मॅड' चित्रपटाच्या लोकप्रियतेत या पोरट्यांचा हिस्सा शम्मी कपूरइतकाच मोठा आहे.

आपल्या त्या जुन्या, अवीट आणि अविस्मरणीय 'ब्रह्मचारी' चित्रपटाचे आणि या १९६८ मधल्या हिंदी रंगीत संगीत देमार लोकप्रिय 'ब्रह्मचाऱ्या'चे काहीही नाते नाही. अमेरिकेतले केनेडी आणि मुंबईतला केनेडी ब्रिज, लेखक–दिग्दर्शक विश्राम बेडेकर आणि मसालेवाले बेडेकर, यांच्याप्रमाणे या दोन्हीतदेखील फक्त नाममात्रच संबंध आहे.

एवढे लक्षात ठेवले तर हा 'ब्रह्मचारी' देखील करमणूक म्हणून अगदीच वाईट नाही. ◻

# फुले

मुंबईत सध्या 'थरली मॉडर्न मिली'नामक एक चित्रपट गाजतो आहे. 'थरली मॉडर्न मिली' ही पदवी जिला सन्मानपूर्वक देता येईल अशा एका चित्रकर्त्रीच्या चित्र-प्रदर्शनाला काल पोचलो. या चित्रकर्त्रीचे नाव सौ. प्रफुल्ला डहाणूकर (जोशी). मुंबईच्या पुंडोले आर्ट गॅलरीत हे प्रदर्शन चालू आहे.

या 'थरली मॉडर्न' चित्रकार मंडळींची चित्रे नाहीत तरी त्यांचे विषय कित्येकदा अफाट आणि क्लिष्ट असतात. काही वेळा ते इतके अफाट असतात की, त्यांचे त्यांनाच ते शब्दांकित करता येत नाहीत आणि मग 'चित्र क्रमांक अमुक', 'चित्रकारांचा मूड' नाहीतर साधेच 'चित्र' असले काहीतरी शीर्षक हे प्रतिभाशाली

प्राणी त्याला देऊन नामानिराळे होतात. ज्याने त्याने पाहून त्या चित्राचा कसाही अन्वयार्थ लावावा. याउलट काही वेळा 'केनेडी यांचा खून', 'जगबूड', 'क्षणाचा पक्षी', 'समुद्र'; 'सूर्यास्त' असली बाळबोध शीर्षके असलेली या मंडळींची चित्रे त्यांत अनुक्रमे केनेडी, जग, पक्षी, समुद्र किंवा सूर्य नसल्याने त्यांतल्या केवळ रंगांच्या आणि आकारांच्या उत्स्फूर्त उधळणीने मामुली माणसाला चकरावून टाकतात यातले समुद्र हे चित्र सूर्यास्त का नाही आणि जगबूड या चित्राला केनेडी किंवा किंग किंवा दुसरे केनेडी यांच्या खुनाचे शीर्षक का देऊ नये, याला तुमच्या–आमच्यापाशी काही उत्तर नसते. या चित्रकार मंडळींकडेही ते नसते.

कारण यांचे चित्र मुळी अमूक एका विषयावरचे नसतेच. एखाद्या विषयाच्या निमित्ताने झालेला तो रंगांचा आणि आकारांचा विशुद्ध आविष्कार असतो. शास्त्रोक्त संगीतात जसा स्वरविस्तार तसा या चित्रकारांचा हा रंग–आकारांचा आविष्कार–त्याला विषय नसतो, ऊर्मी असते.

पण ही अफाट आणि क्लिष्ट मंडळीदेखील एखादे वेळी फार फार साधी आणि सरळ होतात. पुंडोले आर्ट गॅलरीतले हे प्रदर्शन असे आहे. याचा विषय आहे 'फुले' आणि चित्रात चक्क फुलेच आहेत.

––फुले आपण पाहातोच. मुंबईत ती खुडलेली आणि पाणी मारून ताजी ठेवलेली पाहतो; मुंबईबाहेर झाडावर पाहायला मिळतात. मोगरा, जाई, जास्वंदी, गुलाब, प्राजक्त, पिवळा–हिरवा चाफा आणि अगदी झेंडू घेतला तरी त्याला त्याची अशी एक नैसर्गिक गंमत आहे. रानफुलांनाही त्यांचे साधेबगडे सौंदर्य असते. गंध नसलेल्या विलायती फुलांना फॅशनेबल विदुषींचा भपका असतो. केवळ गुलाबातच सौंदर्याच्या वेगवेगळ्या छटा असलेले सुमारे साठएक प्रकार आहेत. फुलांवरच्या चित्रांची पुस्तके पाहिली तरी डोळे जादूगार निसर्गाच्या किमयेने कसे अगदी दिपून जातात. काही नाही तर प्लॅस्टिक नाही तर कागदाची तरी फुले आपण घरात मांडून ठेवतोच. जपानी लोक तर फुलांच्या रचनेचेच एक भले थोरले शास्त्र बनवून राहिले आहेत. या शास्त्राला घराप्रमाणे फुलांची रचना मंजूर नाही. फुले याहून महत्त्वाची मानण्यात आली आहेत. त्या त्या ऋतूप्रमाणे फुले आणि या फुलांप्रमाणे आख्ख्या घराची नवनवीन रचना फूल-वेडे जपानी लोक करतात. घरातल्या फुलांना 'मॅचिंग' कपडे परिधान करतात.

पण या फुलांहून चित्रकारांच्या मनात फुलणारी फुले वेगळी असतात. गायकाच्या गळ्यावाटे स्फुरणारा पावसाळा, वसंत ऋतू, विरह, रात्र, ही जशी प्रत्यक्षाहून रम्य, गहिरी, स्वरांच्या जादूने मंतरलेली असतात तशी चित्रकाराच्या मनातली फुले प्रत्यक्षातली नावे, वैशिष्ट्ये, तपशील हरवून एका निराळ्याच रंगरेषांच्या जादूने मंतरलेली असतात. त्याचा सुंदर प्रत्यय या प्रदर्शनात मिळतो.

या प्रदर्शनातल्या फुलांची उगाच नावे विचारण्यात हशील नव्हते आणि ती

विचारावीशीही वाटत नव्हती. प्रत्यक्षाची कमजास्त ओळख देणारी ही एका प्रतिभेवर उमललेली फुले होती. गॅलरीत शिरल्याबरोबरच सलामीचे चित्र दिसले ते मुळी एखाद्या नर्तकीच्या बेभान चैतन्यशाली 'पोज' सारखे. या नर्तकीचा लयबद्ध आविर्भाव पिवळ्या, हिरव्या, लाल रंगांच्या उःत्स्फूर्त फुलांचाच जणू घडला होता. आणि नाजूक पुष्पपात्राच्या रूपाने तिचे शरीर डौलदारपणे उभे होते. आविर्भाव आणि शरीराची उभारी यांचा तोल परस्परांनी कसा छान सांभाळला होता. आणि शिवाय पार्श्वभूमीने गुणी नर्तिकांच्या एखाद्या संघाप्रमाणे या तोलाला आपल्या अस्तित्वाने सुरेख महिरप दिली होती. आता ही फुले कोणती हे विचारण्याला सवडच कुठे ? मनाशी म्हणालो, ही नृत्याची फुले. पुढल्या एका चित्राकडे पाहिले मात्र आणि झगझगीत पिवळी-हिरवी फुले नजरेसमोर कापसाचे बोंड फुटावे तशी फुटून चौकटीत पसरली. फुलांचा फुलाइतकाच नाजूक, निःस्तब्ध पण चैतन्यमय रंगाचा स्फोट ! अण्वस्त्रांचे स्फोट, दारूगोळ्याचे स्फोट यांना क्षणमात्र तरी निष्प्रभ करणारा हा मूर्तिमंत सौंदर्याचा स्फोट ! मनाशी मी या फुलांना नाव दिले, मीलनाची फुले. तिसऱ्या एका चित्रात मंद लाल रंगाची जास्वंदीसारखी फुले अंतर्मख होऊन कसल्याशा आठवणीत हरवलीशी वाटत होती. ही स्मृतींची फुले— मी म्हणालो. आणखी एका चित्रात गुलाबमहाराज—- पण चित्रकर्त्रीच्या प्रतिभेतले— प्रथमदर्शनी—प्रेमाचा अद्भुत क्षण हा आत्ताच निसटल्यासारखे धूसर—सावळ्या रंगवादळात बेहोष भारावून भिजून त्या क्षणासाठी चौफेर पाहत धुंद उभे होते. ही ( मी मनाशी उगीच म्हटले ) प्रेमवेडी फुले. एका चित्रातली गुलाबी फुले हिवाळ्यातल्या मावळतीच्या प्रकाशाच्या महापुरातून पुष्पपात्राची नाव करून अज्ञाताच्या प्रवासाला निघाली होती. आणखी एका चित्रात काळोखाच्या अपरात्री एका गडद पुष्पपात्रात अंधारलेल्या आभाळाखाली काही काळोखाची फुले मांडली होती. ती फार फार एकाकी, असहाय्य वाटत होती. त्यांच्या अशक्त पांढऱ्या बाह्यरेषा काळोख्या आभाळाच्या मगरमिठीपासून त्यांना कसेबसे वेगळे ठेवीत लढत होत्या आणि त्यातले एक बिचारे तर गळून मातीला बिलगून एकटेच रडत होते. पलीकडच्या चित्रातली नाजूक पिवळी फुले हुबेहूब, मीलनाच्या अबोध भयाने आणि उत्कंठेने थरथरणाऱ्या नववधूसारखी अंग अंग लवून थरथरत होती. एका चौकटीतली फिक्कट पांढरी गवतासारखी फुले दीर्घ प्रतीक्षेत समाधिस्त होती तर एका चौकटीत, श्रावण्यातल्या झपाटून टाकणाऱ्या वैभवशाली पिवळ्याधम्मक उन्हाचीच फुले होऊन ती पिवळ्या धम्मक उन्हात मजेत डुलत होती. त्या उन्हात आपणही मनोमन माखून निघत होतो.

फुले एरवी पुष्कळ पाहिली, पण ही फुले वेगळी होती. नावे-गावे गाळून आणि एका कलावंताच्या प्रतिभेचा स्पर्श लेवून, अनामिक, असीम, स-चेतन होऊन आपापल्या चौकटीत एकेका मनःस्थितीने झपाटून घेऊन ही उभी होती. जणू फुलांच्या

या चित्रांच्या रूपाने चित्रकर्त्रीने एकेक मन:स्थितीच आवेगाच्या एकेका झपाटद्यात व्यक्त करून टाकली होती. अशी फुले कोठल्या बागेत फुलणार आणि कुठल्या माळ्याकडे मिळणार ? ही या प्रदर्शनातच पाहायची. त्यांचा एकेका मन:स्थितीचा उग्र नाहीतर सौम्य गंध उम्या उम्या छातीत भरून घ्यायचा आणि मुकाट्याने बाहेर पडायचे.

कारण या सुंदर फुलांच्या किमती तुम्हा आम्हांला परवडणार थोड्याच ? पाच पाचशे रुपयांना इथल्या फुलांचा एकेक गुच्छ ! बड्या मंडळींच्या उंची घरातच यांचे स्थान.

पण कलावंतांच्या प्रतिभेची ही चैतन्य युक्त फुले पहाण्याचे आणि दृष्टीने लुटण्याचे पैसे तर कोणी घत नाही ?

तेवढेही पुष्कळ आहे. ○

## □ पाव कसा भाजावा ?

हिंदुस्थानाला कोठकोठल्या गोष्टींसाठी परकीय तज्ज्ञांची गरज लागेल हे सांगणे कठीण झोले आहे. नुकतेच एक ' बेकरी ' तज्ज्ञ पाव कसा भाजावा हे शिकविण्यासाठी हिंदुस्थानात आले आहेत. ऑस्ट्रेलियातील " ब्रेड रिसर्च इन्स्टिटयूट " चे हे तज्ज्ञ केलिन मोझेस म्हणतात ही संस्था म्हणजे एखाद्या व्यवसायातल्या सर्व मंडळींच्या हितासाठी त्याच व्यवसायाने काढलेल्या संशोधन-संस्थेचे एक दुर्मिळ उदाहरण आहे. बेकरी व्यवसायाने स्थापन केलेली संस्था कणकेचा व कामाचा दर्जा देशभर चांगला राहावा याची दक्षता घेते. कणकेची नवीन मिश्रणे व नवीन पावपद्धती यांचे संशोधन या संस्थेतर्फे होते. पाव बांधण्यासाठी जो मेणकागद वापरला जातो तो किती चांगला आहे याची तपासणीही प्रस्तुत संस्था करते. ' चांगला पाव मिळण्यासाठी ही गोष्टही महत्त्वाची आहे. संस्थेचा प्रतिनिधी देशातल्या प्रत्येक बेकरीवाल्याला वर्षातून निदान एकदा तरी भेटतो व सूचना, प्रात्यक्षिक इत्यादी स्वरूपाची मदत करतो. ऑस्ट्रेलियात एकूण एक हजार बेकरीवाले असून १९० पिठाच्या गिरण्या आहेत.

हिंदुस्थानात सरकारतर्फे निरनिराळ्या शहरांत बेकरी-व्यवसाय सुरू करण्यात येणार आहे, त्यात ही ऑस्ट्रेलियन बेकरी संस्था मदत करणार आहे. या व्यवसायासाठी आवश्यक ती यंत्रसामग्री ऑस्ट्रेलियाकडून मिळाली आहे. ही यंत्रसामग्री अगदी साधी व व्यवहार्य असल्याने हिंदुस्थानातील सध्याच्या परिस्थितीला अगदी अनुरूप अशी आहे. ' या सामग्रीने बेकरी व्यवसायात आर्थिक फायदा तर होईलच पण पावाची शुद्धता व त्याचे पौष्टिक मूल्य यांच्यातही सुधारणा होईल. ◻

# २२ जूनची रात्र

परी जयांच्या दहनभूमीवर
नाही चिरा नाही पणती. .

असे हुतात्मे म्हणजे चाफेकर बंधू! ज्यांनी गेल्या शतकाच्या अखेरीस आपल्या अतुलनीय त्यागाने भारताच्या स्वतंत्र्यलढ्याचे रणशिंग फुंकले.

माणसे इतिहास घडवीत होती असा तो कालखंड होता. १८८५ साली राष्ट्रसभेची स्थापना झाली. भारतीय जनतेकरिता, राजकीय प्रगतीसाठी काही सुधारणा परकीय सत्ताधाऱ्यांकडे अर्जविनंत्या करून मिळवाव्या, असे वाटणारी देशप्रेमी सुशिक्षित मंडळी, राष्ट्रसभेकडे आकर्षली गेली होती. आणि याचबरोबर सामान्य जनतेत प्रखर राष्ट्रवादाची एक लाट फैलावू लागली होती.

महाराष्ट्रात त्या वेळी दुष्काळाने हवालदिली निर्माण केलेली होती. त्यातच १८९७ साली पुण्यात व आसपास प्लेगने कहर उडविला. साताऱ्याचा असिस्टंट कलेक्टर असलेला युरोपियन अधिकारी रँड याने पुण्याचा प्लेग-कमिशनर या नात्याने पुण्यात प्लेग-प्रतिबंधक उपायांची अंमलबजावणी करताना लोकांचा अनन्वित छळ सुरू केला.

गोपाळ कृष्ण गोखले त्या वेळी लंडनला होते. जुलै महिन्यात त्यांनी 'मँचेस्टर गॉर्डीयन' पत्राला दिलेल्या मुलाखतीद्वारे, रँडने चालविलेल्या दडपशाहीला ब्रिटिश जनतेपुढे तोंड फोडले होते. या मुलाखतीत गोखल्यांनी सांगितले—



"लोकांच्या चालीरीतींविषयी अज्ञानी असलेले ब्रिटिश सोजीर जनतेच्या भावना पायाखाली तुडवून, त्यांच्या स्वैंपाकघरांत व देवघरात घुसून अन्नाची नासाडी करीत, देवतांच्या मूर्तींवर थुंकून त्या घराबाहेर रस्त्यावर फेकून देत आहेत. साथीने जर्जर झालेल्या लोकांच्या उरल्या-सुरल्या चीजवस्तूंचा नाश त्यांच्या डोळ्यांदेखत घडत आहे. सोजीर प्लेगने आजारी असलेल्यांचे कपडे-लत्ते हिसकावून घेतात, त्यांच्या पेटचा, ट्रंका उघडून त्यातील मूल्यवान दागिने ते काढून घेतात व घरातले फर्निचर जाळून निघून जातात. याहून लाजीरवाणा प्रकार म्हणजे स्त्रियांना तपासणी करण्याच्या मिशाने घरात अंधार आहे म्हणून रस्त्यावर काढून विवस्त्र करण्यात येत आहे."

रँडच्या जुलूमशाहीतून सुटका व्हावी म्हणून अगतिकपणे माणसे सरकारकडे अर्ज-विनंत्या करीत होती, शिष्टमंडळे धाडीत होती, वृत्तपत्रांतून सरकारला निवेदने प्रसिद्ध होत होती. टिळकांनी 'केसरी' पत्रातून सरकारला इशारा दिला. परंतु कशाचा काही उपयोग होण्याचे चिन्ह दिसत नव्हते. ब्रिटिश पार्लमेंटमध्ये भारताचे सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉर्ड हॅमिल्टन यांनी गोखल्यांचे आरोप हे बाष्कळ म्हणून त्यांची विल्हेवाट लावली. आणि या पार्श्वभूमीवर चाफेकर बंधू आणि त्यांचे सहकारी यांनी राजकीय क्षितीज उजळून टाकले.



उध्वस्त अवस्थेत असलेली पुण्याच्या गणेशखिंड मार्गावरील ही रँडची स्मारक–शिला. चाफेकर बंधूंचे स्मारक !

दामोदर हरी चाफेकर हे थोरले. पुण्यातच राहणारे चित्पावन ब्राह्मण. त्यांचे वडील भिक्षुकी करीत. दामोदरपंतांनी तोच पेशा पत्करला होता. बालपणातच एडनच्या तुरुंगात खितपत

## नाही चिरा नाही पणती

पडलेल्या क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या हौतात्म्याचा परिणाम त्यांच्यावर विशेष झालेला होता. आपले दोघे बंधू बाळकृष्ण व वासुदेव यांच्यासह दामोदरपंतांनी १८९५ मध्ये भारतमातेला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी एक गुप्त क्रांतिकारी मंडळी स्थापन केली होती.

रँडकडे त्यांचे लक्ष जाण्यापूर्वी दामोदरपंत चाफेकर स्वस्थ नव्हते. धाडसाची लहान-सहान कृत्ये त्यांनी पार पाडली होती. मुंबई शहरातील व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याला डांबर फासून व त्या पुतळ्याच्या गळयात जोडयांची माळ घालून स्वारी परतलेली होती. विश्वविद्यालयाच्या परीक्षेसाठी घातलेला सभामंडप त्यांनीच जाळला होता.

रँडच्या दडपशाहीने उग्र रूप घेताच दामोदरपंत चाफेकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्राच्या स्वाभिमानाची जगाला ओळख पटावी म्हणून रँडसाहेबाला निजधामास पाठवण्याचे ठरवले. जवळ जवळ ३ महिने हे सर्वजण रँडच्या पाळतीवर होते. अखेर २२ जून १८९७ या दिवशी त्यांनी शिकार साधली.

पुण्याच्या गव्हर्नमेंट हाऊसवर त्या दिवशी व्हिक्टोरिया राणीच्या हीरक राज्यारोहण दिनानिमित्त मोठा उत्सव होता. पुणेकर जनता आसपास दडपशाहीखाली चौफेर कण्हत असताना हा समारंभ साजरा होत होता. पोलिसांचा डोळा चुकवून दामोदरपंतांनी गव्हर्नमेंट हाउसच्या दरवाजाबाहेर रस्त्यावरती जागा हेरून दबा धरला होता. समारंभ संपला. आपल्या सजवलेल्या गाडीत बसून रँडसाहेब बाहेर पडला. वेळ अपरात्रीची होती. वासुदेव चाफेकराने इशारा दिला–" दादा, रँड येतो आहे !" डोळ्याचे पाते लवते न लवते तो दामोदरपंत रँडसाहेबाच्या गाडीवर चढले व पिस्तुलातून त्यांनी पाठोपाठ गोळ्या झाडल्या. मागच्या गाडीत लेफ्टनंट आयर्स्ट होता. दामोदरपंतांचे बंधू बाळकृष्णपंत यांनी आयर्स्टला त्यापूर्वीच गोळ्या घातल्या होत्या.

आयर्स्ट जागच्या जागी गतप्राण झाला. रँडला रुग्णालयात नण्यात आले. तिथे तो ३ जुलै १८९७ रोजी रात्री मरण पावला.

आश्चर्य म्हणजे पोलिसांना जागच्या जागी कुणालाच पकडता आले नाही. तीन महिन्यांनी दामोदरपंतांना अटक झाली. धीरोदात्तपणे दामोदरपंतांनी आपण रँडला मारल्याचे कबूल केलें, व मृत्यूची शिक्षा हसतमुखाने ऐकली. बाळकृष्ण चाफेकर हैद्राबादला संस्थानचे न्यायाधीश केशवराव कोराटकर यांचेकडे पळून गेला. अखेर त्यालाही अटक झाली व मृत्युदंड सुनावण्यात आला.

दोन्ही चाफेकर बंधूंच्या ठावठिकाणासंबंधी माहिती देणाऱ्याला सरकारने रु. २०,०००/– चे इनाम जाहीर केले होते. पुण्याच्याच द्रवीड बंधूंनी हरामखोरी करून दामोदरपंतांना पकडून दिले होते व या हरामखोरीबद्दल त्यांना रु. १०,०००/– मिळाले होते. चाफेकर बंधूंतील सर्वांत धाकटा वासुदेव याने द्रवीड बंधूंना धडा

शिकवण्याचे ठरवले. रानडे अजून मोकळे होतेच. रानडे यांच्यासह वासुदेव चाफेकर द्रविडांच्या घरी गेले व दोघांनी गोळ्या झाडून ८ फेब्रुवारी १८९८ या दिवशी द्रविडबंधूंना यमसदनाला धाडले. दोघे पकडले गेले व मार्च १८९९ मध्ये दोघांना मृत्युदंडाची शिक्षा देण्यात आली.

तिन्ही चाफेकर बंधू व रानडे यांना येरवडा तुरुंगातच फाशी देण्यात आले. त्याच कारागृहात त्या वेळी लोकमान्यांना ठेवण्यात आले होते. लोकमान्य टिळकांकडून गीतेचे पुस्तक दामोदरपंतांनी मागून घेतले. एका हातात गीतेचे ते पुस्तक घट्ट धरून दामोदरपंत १८ एप्रिल १८९८ या दिवशी फाशीची फळी चढले. त्यांनी फासाचे चुंबन घेतले व मान फासात अडकवली. पुढे वर्षभराने ८ मे १८९९ रोजी सकाळी वासुदेवाला फाशी–कोठीबाहेर काढण्यात आले. बाळकृष्णपंत चाफेकर यांच्या कोठीवरून जाताना वासुदेवाने ओरडून सांगितले–

"भाऊ, मी निघालो रे!"

बाळकृष्णाने त्याला प्रतिसाद दिला–


"तू पुढे हो. मी परवा पाठोपाठ येतोच आहे...!"

परंतु १० मे १८९९ ला रानडे यांची फाशी मुक्रर झालेली होती. १२ मे १८९९ला बाळकृष्णपंत चाफेकरांनी आपले प्राणार्घ्य भारतमातेच्या स्थंडिलावर सोडले. चार तरुण भारताच्या स्वातंत्र्यवेदीवर आपल्या तारुण्याची फुले उधळून गेले. फुलेच–कधीही न कोमेजणारी!

फाशी गेले तेव्हा दामोदरपंतांचे वय अवघे २५ वर्षांचे होते. मागे आई, पत्नी व दोन लहान मुले ठेवून ते गेले. पुत्रशोकाने वर्षभरात चाफेकरबंधूंचे वडील वारले. आणखी वर्षभरात बाळकृष्णपंतांची पत्नी यमुनाबाई निधन पावल्या. वासुदेवाची पत्नी सीताबाई १९२० सालापर्यंत हयात होती. ◻

**विजयकुमार सिंग**

**[ हु. भगतसिंगांचे बंधू**
**यांच्या लेखातून उद्धृत ]**






## नव वर्षाच्या उदयामधुनी

नव वर्षाच्या उदयामधुनी विश्व नवीन फुलावे ।
नव आशांच्या क्षितिजावरती नव रसरंग खुलावे ।।
गत वर्षांतिल स्मरणे सुमधुर
त्यांवर राहिल लहरत अंतर
विरल कुठे तरि अप्रिय अनुभव अलगद ते विसरावे ।।
कधी साधना कधी वेदना
कधी वंदना कधी वंचना
विरुनि दुःखकण विस्मृति–सागरिं सौख्य सुखांत मिळावे।।
असंख्य अपुली अपुरी ध्येये
तशीच विस्मृत पवित्र कार्ये
प्राण ओतुनी तयात, अपयश यशगंगेत धुवावे ।।
विकसन ही प्रकृती विश्वाची
मंगल लीला परमेशाची
'अंश तिचा मी' हृदयी स्मरुनी मोहतिमिर निवटावे ।।
आजवरी जो सुगंध घेउन
समृद्ध केले अपुले जीवन
तोच वितरुनी अवती भवती जगजीवन फुलवावे ।।

*ना. वि. गोडसे*

## पूर्वी आणि आता !

पूर्वीच्या माणसांना
एक भीती वाटत असे,
' पाप ' केले तर मरणानंतर
' नरक ' भोगावा लागतो ' स्वर्गी ! '
पण, आता ! !
चंद्र, सूर्य, तारे, हे सगळे
' ग्रह ' आहेत समजले विज्ञानाने,
' आकाश ' ही एक पोकळी ठरली
फिरू लागलीत ' आकाशयाने ' !
सगळंच समजतंय आता !
या ' अमीबा 'च्या अस्तित्वाला
पण, हा सगळा घोटाळा
कोठे नेणार आहे ' माणसाला ' ?

*विश्वनाथ पिलारे*

## प्रवासी

तो आपल्याच विचारांना विचारीत जात होता.
थांबला तेव्हा !
त्याच्यापुढे अंधार पसरलेला होता.
उलट दिशेने येणाऱ्या प्रवाशाला त्याने विचारले
बाबा !
आचाराकडे जाण्याचा रस्ता कुठला ?
बिचारा हसला नी म्हणाला--
मीसुद्धा तिकडेच जातो आहे
तो पहातच राहिला

*— शिवराम देवलकर*

## ही मानवता !

ही मानवता ! जय मानवता !
ही मानवता ! जय मानवता !
स्वतःची पिले नित्य खाणाऱ्या मांजरीसारखी
फिरत असते युगायुगांच्या माजघरातून
जन्माला घालते महान आत्मे
संकटांचा चारा कष्टांची वादळे
त्यागाच्या चिघ्या आत्मतुष्टीचे ओंजळभर
पांढरे दूध पाजून पुसून पोसत असते
हिच्यासाठी ते सदा जळतात तहानभूक विसरून
मागे धावतात जीव टाकतात
आकाशाचे पान घेऊन काळ त्यांची लिहितो
श्रेय नामावली वेडयांची वेडी अभंगावली
सामान्य खुराडी श्वास सोडतात भलेपणाचे
गुणगौरवाचे जयजयकाराचे
मातीपाण्याला कळा चढते
नुकत्याच जन्मल्या ओल्या मुलाची
अन् त्याच वेळी या मांजरीला लहर येते
स्मशानामध्ये उंच चंदनाचे सरण रचून
गंगा यमुनेचा घोट घेऊन
एका महान आत्म्याचे शरीर
जाळून खाण्याची, त्याच्या राखेत मुक्त लोळण्याची...
भरून ठेवते आपल्या डोळ्यात
त्याच वेळी त्याचा जागता अमृत आत्मा
म्हणूनच तिला
दिसत असतात घट्ट अज्ञात अंधारतीर...
ही मानवता ! जय मानवता !

*—राजा महाजन*

# विद्यार्थी परिषद

*

# शिबिर तळासरी

कोठल्याही शिबिरात शरीरश्रमाचा कार्यक्रम असणे, त्या भागात एखादे बांधकाम करणे हे जसे उद्दिष्ट असू शकते, त्याचप्रमाणे त्या भागातील लोकांना जास्तीत जास्त जवळ आणणे, त्यांच्या संपूर्ण परिस्थितीची जाणीव करून घेणे, हाही एक भावी नागरिक म्हणून उद्देश असू शकतो. आणि याच उद्देशाने 'अखिल भारतीय विद्यार्थी परिषदे'चे एक शिबिर दि. १२ ते १९ मे पर्यंत ठाणे जिल्ह्यातील तळासरी नावाच्या गावात भरले होते.

शिबिराच्या पहिल्याच दिवशी तळासरीतील एक समाजकार्यकर्ते श्री. माधवराव काणे यांनी तळासरीचा परिचय करून देताना सांगितले होते, की येथील वारली हा पांढऱ्या कपड्यांना फार घाबरतो. पांढऱ्या कपड्यां-बद्दल त्याला चीड आहे. सावकारांनी केलेल्या अनन्वित

अत्याचारांमुळे व जुलमांमुळे, त्याचप्रमाणे काही वर्षांपूर्वी या भागात झालेल्या भीषण गोळीबारामुळे तो पांढऱ्या कपड्यांबद्दल साशंक आढळतो. विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते जेव्हा शिबिराच्या एकूण कार्यक्रमाचा एक भाग म्हणून गावातील लोकांना भेटावयास जात, तेव्हा त्यांनाही हाच अनुभव आला. केवळ गप्पागोष्टींतून परिषदेचे कार्यकर्ते अनेक प्रकारची महत्त्वाची माहिती याच आधारावर मिळवू शकले.

पाटीलपाडा, दुमारपाडा, हडळपाडा इत्यादी आठ वस्त्यांत विभागलेला हा गाव संपूर्ण मागासलेला आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत घरी धान्य शिल्लक नसल्यामुळे अजूनही अनेक लोकांना कंद खाऊन पोट भरावे लागते. काहीजण तर ताडी पिऊनच भूक भागवितात. त्यांच्या आळशी आणि भोळ्या स्वभावाचा फायदा अनेक लोक अनेक तऱ्हांनी घेत असतात. तळासरीत एक ख्रिश्चन मिशन गेली ५० वर्षे धर्मप्रसाराचे काम करीत आहे. अमेरिकेकडून मिळणाऱ्या धान्याचा (P. L. 480) २० टक्के भाग चॅरिटी म्हणून मिशनला मिळतो. हेच धान्य मिशन गरीब वनवासींना सरकारी दरापेक्षा कमी दराने ( गहू ८ ते १० आणे किलो) देते. दिलेल्या धान्याबद्दल रोख पैसे न घेता, दीडपट धान्य पिके आल्यावर वसूल करण्यात येते. दरिद्री वनवासी भुकेपोटी मिशनचे धान्य घेताना त्यांचे गोडवे गातात.

तळासरीपासून ३ मैलांवर असलेले ‘ वरखंडा ’ नावाचे गाव तर संपूर्ण ख्रिश्चन झालेले आहे. गावातील ५० घरांपैकी ४८ घरे ख्रिश्चनांची आहेत. गावचा पाटील व

शाळामास्तर फक्त हिंदू राहिले आहेत. मिशनच्या पैशाच्या व धान्याच्या पुरवठ्यामुळे अनेक गरीब वनवासी कुटुंबे ख्रिश्चन होत आहेत. देवी टोचण्यापासून ते कुटुंब-नियोजनापर्यंतच्या प्रश्नांवर मिशनचे फादर म्हणतील तो निर्णय अखेरचा मानला जातो. सरकारी अधिकाऱ्यांपेक्षा फादरचा पगडा या गावात जास्त आढळला. एवढेच नव्हे तर सार्वजनिक निवडणुकीतही फादर सांगेल त्यालाच मत द्यावे लागते.

तळासरी गावात होळी व दिवाळी हे दोन प्रमुख सण अत्यंत उत्साहाने आणि खेळीमेळीत पार पाडले जातात. दिवाळीनंतर बाहेर येणाऱ्या तारपा नावाच्या वाद्यावर अनेक वनवासी धुंद होऊन रात्र रात्र नाचत असतात. तारप्यावर होणाऱ्या नाचातूनच अनेक विवाह ठरतात.

विद्यार्थी परिषदेच्या अनेक कार्यकर्त्यांनी त्यांच्या घरात जाऊन, त्यांच्या शेजारी जमिनीवर बसून अशा प्रकारची त्यांच्या रोजच्या व्यवहाराची माहिती करून घेतली. शिबिरातील कार्यकर्त्यांनी गावातील प्रत्येक कुटुंबाशी आठ दिवसात निर्माण केलेले भावाचे नाते हेच एक शिबिराच्या अनेक उद्दिष्टांपैकी सफल झालेले उद्दिष्ट होते. शिबिरासाठी गावातील सर्वांनी पुढे केलेला सहकाराचा हात आणि पुढील वर्षासाठी दिलेले आग्रहाचे निमंत्रण हेच त्यांच्याशी निर्माण झालेल्या अतूट अशा नात्याचे प्रतीक होते. □

— मुकुंद गोडबोले



प्रा. अंबादास माडगूळकर

जागा झालो तेव्हा पुरते उजाडलेले नव्हते. तांबडे फुटले असावे. दुधिया रंगाचा प्रकाश खिडकीतून आत येत होता. खिडकीच्या खालून टाळांची झणझण एकाएकी ऐकू आली आणि क्षणभर आपण कोठे आहोत हेच समजेना. खिडकीतून डोकावून पाहिले तेव्हा भगव्या पताका घेतलेले काही मुंडासेवाली मंडळी दिंडी घेऊन चालली होती, हे लक्षात आले. "पंढरीसी जावे ऐसे ज्याचे मनी, त्याची चक्रपाणी वाट पाहे" असा अभंगातील चरण निसटता कानी पडला. आणि मग उलगडा झाला, की आपण पंढरपुरात आहोत, आणि आज चैत्री वारी आहे!!

विद्यापीठाच्या कामासाठी आलो होतो. पंढरीत सर्वसामान्य माणसे ज्या ठिकाणी उतरतात तेथेच, म्हणजे गाडगेबाबांच्या मठात उतरलो होतो. आज सुटी असल्याने महाविद्यालय बंद होते. दिवस मोकळाच होता. फार दिवसांनी वारीच्या मोसमात पंढरीला आलो होतो. वारीचो मौज पुन्हा एकदा लुटावयाची हे ठरविलेही होते. तसा पूर्वी अनेकवार पंढरीला आलो होतो. आईची वारी 'पोचविण्यासाठी' घाईगर्दीने पंढरीच्या अनेक खेपा झाल्या होत्या. भाकरीचे 'गटळे' सांभाळीत फरशी घातलेल्या बोळातून मी अनेक वेळा हिंडलो होतो. सादळलेले कुरमुरे व

साखरफुटाणे प्रसाद म्हणून येथून मी अनेक वेळा नेले होते. पण या गोष्टीला फार दिवस झाले होते. जवळ जवळ पंधरा वर्षांच्या अंतराने पुन्हा पंढरीस आलो होतो.

प्रार्तविधी आटोपले आणि खोलीला कुलूप घालून माडीच्या पायऱ्या उतरलो. मठाच्या मधल्या रंगणात 'बहुत मंडळी' जमली होती. तांबडी-पांढरी मुंडाशी घातलेली मंडळी बायका माणसांच्या गराडचात बसली होती. गोंडयांचे ' टकुचे ' घातलेली तान्ही–वडदी पोरे मिरमिरत्या डोळयांनी इकडेतिकडे बघत होती. ' गठुडचा 'वर हात ठेवून बायका काहीबाही बोलत होत्या. सगळयांचे चेहरे एकजात रापलेले होते. काल एस्. टी. तून आल्यामुळे त्यांची अंगे रवरवत असावीत असे दुरूनही जाणवत होते. खरेतर चैत्रीवारी ही काही मोठचा वाऱ्यांपैकी नव्हे परंतु ' आषाढी–कार्तिकी 'प्रमाणे आसपासचे भक्तजन चैत्री वारीलाही दाटी करतात, हे मला माहीत होते. मठाच्या खालच्या मजल्यावर पांडुरंगाची मूर्ती स्थापिलेली आहे.

# वारी घडली!

शेजारी गाडगेबाबांची मोठी थोरली तसबीर लावलेली आहे. त्यांच्या मुद्रेवर जिवंतपणी दिसावयाचा तसला भाबडा भाव तसबिरीत बरोबर उमटलेला होता. काही मंडळी जमून बाबांच्या चित्राकडे ' ध्यान ' लावून बघत होती. मी लहानपणी बाबांना प्रत्यक्ष पाहिले होते. ' गोपाला, गोपाला, देवकीनंदन गोपाला... ' या भजनात जमावाला दंग ठेवून ते कसे पसार होत असत, हे मी स्वत: अनुभविले आहे.

आसपास भिंतीवर अनेक फोटो टांगलेले दिसले. काही शेटसावकारांची नावेही देणगीदार म्हणून लाकडी फळयावर लिहिलेली आढळली. मठाच्या महाद्वारातून बाहेर पडलो.

राजरस्त्याला वारकऱ्यांची रीघ लागली होती. दिंडयांवर दिंडया येऊन मिळत होत्या. वीणा झंकारत होत्या. टाळ झणाणत होते. हरिनामाचा गजर होत होता. भाविकांबरोबर भिकाऱ्यांची गर्दीही दिसत होती. अंधळे, थोटे, पांगळे, नानातऱ्हेचे भिकारी माळा लावून चालले होते. आज त्यांचीही पर्वणी ! बाबांच्या मठाच्या मागे दुसरा एक मठ दिसला, तिकडे वळलो. राजप्रासादाला लाज वाटावी असे

देखणे इमारत-काम होते. आत जाऊन पाहिले तेथेही असंख्य फोटो लावलेले होते. विविध व्यक्तींचे बुवांच्या बरोबर विविध प्रसंगी काढलेले ते फोटो होते. तात्याराव सावरकरांपासून इंग्रजी कलेक्टरापर्यंत सर्व मंडळींची दर्शने या तसबिरीतून घडत होती. मठाच्या समोर मोकळी जागा भरपूर होती. त्यात भिकाऱ्यांचा फार मोठा जमाव जमला होता. मी कोणालातरी विचारले, "आज येथे काय आहे ?" "बुवा आज भिकाऱ्यांना फराळाचे देतात," कोणीतरी म्हणाले. कुतूहलाने गर्दीत उभा राहिलो. भिकाऱ्यांनी पंक्ती केल्या. मग कोणीतरी पंक्तीच्या मध्यभागी ध्वनिक्षेपक आणून ठेवला. – आणि बुवा आले ! बुवांच्या येण्यात डौल किंवा बडेजाव मुळीच नव्हता. लगालगा येऊन ते ध्वनिक्षेपकाशी उभे राहिले. पिढ्यावर नेसलेले दुटांगी धोतर, पिंगट भगव्या रंगाचा सदरा व खांद्यावर पंचा असा बुवांचा वेष होता. मस्तक उघडेच होते. काया चांगली स्थूल पण बुटबैंगण होती. ध्वनिक्षेपक हातात धरून 'भाविकहो !' अशी चक्क भाषणासारखी सुरुवात करून बुवांनी आपल्या दानाचा हेतू सांगितला. दानाचे महत्त्व वर्णन करणारे चार–दोन हिंदी–मराठी अभंगही तडकावले. ध्वनिक्षेपकाशेजारी बसलेली मुले मधूनच दंगा करीत. बुवा ध्वनिक्षेपकातून तोंड बाजूला घेऊन मुलांवर ओरडत व पुन्हा ध्वनिक्षेपकात तोंड घालून दानाचे महत्त्व वर्णू लागत. असा प्रकार बराच वेळ चालला होता. मग बुवांनी जमलेल्या भाविकांना या 'सत्कार्यात' मदत करण्याचे आवाहन केले. 'पैशा-विना माझे कार्य तटणार नाही' असा विश्वासही बोलून दाखविला. बुवांचे आवा-हन येताच एक फेटेवाला पुढे झाला आणि त्याने दहा रुपयाची नोट बुवांच्या हाती दिली. बुवांचा इजारवाला चिटणीस तत्परतेने पुढे आला आणि त्याने ती नोट घेतली. ध्वनिक्षेपकावरून दात्याचे नाव जाहीर झाले. दाता कृतकृत्य झाला. मग हळू हळू ध्वनिक्षेपकाशी दाटी झाली. ध्वनिक्षेपकावर नावे जाहीर होऊ लागली. बुवा मधू-नच 'कॉमेंटरी' देत होते. 'वीस रुपयांपेक्षा अधिक रक्कम द्याल तर 'बोर्डावर' नाव जाईल.' असे सुचवीत होते. आणि त्यांना भरघोस प्रतिसाद मिळत होता. बघता बघता दोनशेच्यावर रक्कम जमा झाली. मला मोठे नवल वाटले. एखाद्या शिक्षणसंस्थेला किंवा अनाथाश्रमाला लोकांनी एवढ्या तत्परतेने मदत केली असती का, असा विचार मनात आला.

ऊन चटचटू लागले होते. बुवांचा चिटणीस नावे टिपून पैसे घेत होता. बुवा आता भिकाऱ्यांच्या रांगेत येऊन त्यांना अभंग सांगत होते. 'दाता लक्ष्मीचा पती, माझे मागणे ते किती' वेड्यावाकड्या आवाजात भिकाऱ्यांची साथ मिळत होती. भजन भराला आले की बुवा 'हरि, हरि' असे ओरडून प्रोत्साहन देत होते. अशी धमाल चालली आहे, तोवर उकडलेली रताळी, शेंगादाणे, राजगिऱ्याचे लाडू यांनी भरलेल्या फराळाच्या पाट्या आल्या. भजनाची लय वाढली. मी काढता पाय घेतला, थोडे अंतर गेलो, तोच मागून 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' चा गजर

उठला. पंक्ती ' बसल्या ' असाव्या ! लघवीची दुर्गंधी येत असलेल्या बोळातून मी पुन्हा राजरस्त्यावर आलो. गर्दीच्या पाठोपाठ चालत दुसऱ्या एका मठाशी आलो.

हा मठ नव्यानेच बांधला होता. शिखराचा रंग व बांधकाम नवे दिसत होते. मठाच्या दाराशी पुष्कळ बायाबापड्या व बाप्ये जमा झाले होते. हा मठ म्हणजे एक मयनगरी होती. जिना म्हणजे एका मगरीचे तोंड होते. यातून आत उतरले की आत असंख्य पौराणिक प्रसंग चित्रित करणारी पुतळेवजा चित्रे होती. यात मार्कंडेय होता, शुक्र होता, दधीची होता, त्याचबरोबर गांधी, नेहरूही होते. चित्रे पाहता पाहताच दुसऱ्या जिन्याने आपण वर येतो. म्हणजे, एका विशाल माशाच्या तोंडातून आपण बाहेर पडतो. मंडळी नवलाईने ही चित्रे बघत होती. पण कोणीही या चित्रांना नमस्कार केल्याचे माझ्या पाहण्यात आले नाही. एखादे प्रदर्शन पाहावे तशा अलिप्त भावनेने हा मठ लोक बघत होते. मनात विचार आला हा मठ बांधण्यासाठी किती पैसा खर्च झाला असेल? मठवाल्या बावाजींनी तो कोठून जमा केला असेल? खेड्यापाड्यांतून कीर्तने करीत बावाजी भटकला असेल का? कीर्तनाच्या प्रभावाने खूष झालेल्या शेतकऱ्या–कामकऱ्यांनी कनवटीच्या चवल्या-पावल्या बुवाला दिल्या असतील का ? हजारो रुपये गिळून उभी राहिलेली ही इमारत त्यातून निर्माण झाली असेल का ? कुणास ठाऊक !

अकरा वाजत आले होते. राजरस्त्याने चालत राऊळाच्या दिशेने गेलो. लोकांची तोबा गर्दी झाली होती. पडश्या-पिशव्या खांद्यावर घेतलेली मंडळी देवळाच्या दिशेने जात होती. अबीर, गुलाल आणि कुंकू यांचा वास कोंदला होता. चंद्रभागेकडे जाण्याचे मनात होते पण ऊन फार लागू लागले. म्हटले संध्याकाळी जावे ! देवदर्शन आज होणे शक्यच नव्हते. शिखराकडे पाहून हात जोडले आणि मठाच्या दिशेने माघारी वळलो.

दुपारभर मठात पाहात होतो. येणाऱ्या माणसांत पांढरपेशे काही दिसत नव्हते! काळ्या सावळ्या चेहऱ्याच्या, ओबडधोबड पातळ नेसलेल्या, आणि अनवाणी पायाच्या बायका. विस्कळीत मुंडासे घातलेले, गोल अंगरखे घालणारे, मिशावाले बाप्ये आणि त्यांची पोरेटोरे यांचीच गर्दी दिसत होती. बडदी पोरे, " बापय माणसा " च्या खांद्यावर पेंगुळली होती. उन्हाने म्लान होऊन काहींनी बापाच्या पटक्याच्या घेऱ्यावर मान ठेवून डोळे मिटले होते. तान्ही पोरे आईच्या काखेत होती. त्यांच्या माथ्यावर आयांनी पदर पांघरू घातले होते. उन्हातान्हातून माणसे येत होती. मठातल्या गार फरशीवर टेकत होती, क्वचित कलंडत होती, आणि ' खिनामारा 'नी उठून पुन्हा अज्ञात दिशेला निघून जात होती. नाक भुवईला टेकत असलेल्या म्हाताऱ्या, वार्धक्याने मान हलत असणारे म्हातारे, सगळ्यांची हजेरी लागत होती. महाराष्ट्राचे रंगरूप जवळून पाहावयास मिळत होते. सातारी, माणदेशी बोलीबरोबर खानदेशी, वऱ्हाडी क्वचित कानडी बोलणीही कानांवर येत

होती. हा सोहळा पाहात मीही एका कोपऱ्यात बसून होतो. मी कोणाला ओळखत नव्हतो. मला ओळखणारे कुणी नव्हते– आणि हे एकपरी चांगलेच होते !

उन्हे कलल्यावर पुन्हा बाहेर पडलो. कित्येक नव्या मठात जाऊन आलो. आणि लक्षात आले, की पंढरपुरात असंख्य मठ आहेत. अगणित धर्मशाळा आहेत. त्या पाहणे काही एक दिवसात होणार नाही. एका मठात आरसे महालासारखे चौफेर आरसे लावले होते. दुसऱ्या एका मठात एखाद्या शहरी ' गेस्ट हाऊस ' ला लाजवतील अशा फरसबंदी खोल्या होत्या. पण एक गोष्ट खटकली. या सर्व मठांनी व धर्मशाळांनी कोणत्या तरी पंथाचे, विभागाचे, जातीचे, उपजातीचे नाव धारण केले होते. मराठी मुलखातील अठरापगड जातींनी आपापले मठ, धर्मशाळा पंढरीत उभारल्या आहेत. या मठात किंवा धर्मशाळात इतरांना मज्जाव असतो असे नव्हे, पण जाताना मन संकोचते एवढे मात्र खरे. आणि दुसरे असे की, या मठांत जुने अगत्य दिसत नाही, कोणीही यावे चूळ भरून भाकर खावी, कोपरा बघून कलंडावे, घटकाभराने गवाळे आवरून आपला रस्ता सुधारावा अशी पद्धत जुन्या मठात असे. नव्या मठांत मात्र एक आधुनिक तुसडेपणा आल्यासारखा वाटतो. तेथे जाता–राहताना मन संकोचल्याखरीज राहात नाही. वारीमुळे बहुतेक सर्व मठ भरलेले होते. माणसांचा राबता चहूकडे जाणवत होता.

बडवे–उत्पातांचे अंधारे वाडे असलेल्या बोळांच्या चक्रव्यूहातून कुठूनतरी चंद्रभागेत उतरलो. एव्हांना आठ वाजून गेले होते. ' भिवरेच्या वाळवंटात ' वारकऱ्यांचे फड पडले होते. चंद्रभागेला पाणी अगदीच थोडे होते. तिचा छोटासा प्रवाह एका बाजूने वाहात होता. शेकडो मनुष्याच्या वावराने ते वाळवंट गजबजलेले होते. एका फडापाशी स्थिरावलो. भजनवाले उभे राहिले होते. एकमेकाला काटकोन करून दोन ओळी त्यांनी तयार केल्या होत्या. मध्यभागी श्रोत्यांना घेतले होते. वैष्णवी मुद्रा ल्यालेले बुवा मृदंगाशी उभे होते. टाळकऱ्यांनी टाळांच्या माळा गळयांत घेतल्या होत्या. बुवांनी मृदंगाला थोडा मुखलेप केला आणि त्यावर आपली सराईत बोटे फिरविली. मृदंग तडाडू लागला. टाळ झिणझिणू लागले आणि मग बुवांनी वरच्या पट्टीत अभंगाला सुरुवात केली :–

" देखिला वो माये यमुनेचे तीरी
हात खांद्यावरी, राधिकेच्या "

टाळकऱ्यांनी टाळ मंद करून बुवांचे शब्द ऐकले आणि बुवांचा चरण संपताच टाळांची लय वाढवून, त्यांची पट्टी अचूक पकडली,

" देखिला वो माये यमुनेचे तीरी
हात खांद्यावरी, राधिकेच्या "

एकापाठोपाठ एक अभंग झडू लागले. तुकारामाचे अभंग तर त्यात होतेच परंतु नामदेव, चोखा, ज्ञानेश्वर, जनाबाई यांचेही अभंग होते. अभंगाबरोबरच

खेळिये, गवळणी यांचीही हजेरी लागत होती.

हमामा पोरा हमामा । दिमडी वाजेतमामा ।।

यासारखे एखादे मारूडही येत होते. भजन रंगत चालले होते. मृदंग तापून घूमू लागला होता. टाळ ठणठणू लागले होते. मृदंग वाजविताना बुवांची मान झुंजू लागली होती. टाळकऱ्यांच्या देहाला मागे पुढे झोले बसत होते.

श्रोतृगणात एकदोन बाया मागे दिसत होत्या. त्यापैकी एक म्हातारी श्रमाने वाळवंटात लवंडली होती. दुसऱ्या लेकुरवाळीने पोराच्या तोंडी स्तन दिले होते. सारे कसे निर्मळ मनाने, निःसंकोच मनाने चालले होते. थोडासा गारठा पडू लागल्यावर मी सगळचा वाळवंटात हिंडून आलो. कुठे कीर्तन चाललेले होते, कुठे गवळण रंगात आली होती, कुठे नुसतेच टाळ मृदंगाचे द्वंद चालले होते. आख्खे वाळवंट हरिनामाच्या गजराने दुमदुमत होते.

एका फडाशी पुन्हा स्थिर झालो. मंडळींची करमणूक चालली असावी. धोतराचा सोगा डोळ्यावर घेऊन एकाने महारणीचे सोंग आणले होते. टाळांच्या तालावर टाळकरी व सोंगवाला दोघेही म्हणत होते.

" महारीण आली पाया पडते, महारीण आली ... "

नंतर दुसरा कोणी महार होऊन आला.

" जोहार मायबाप जोहार, जोहार मायबाप जोहार
तुमच्या महाराचा मी महार ! "

असे म्हणून 'उष्टयासाठी आणलेली पाटी' तो दाखवू लागला. असे भजन पाहता पाहता डोळे पेंगाळले. चंद्रभागेच्या कुशीतच विठ्ठलनामाची आळवणी ऐकता ऐकता कधी झोप लागली कळलेच नाही.

जागा झालो तेव्हा गारवा झोंबत होता. चंद्रभागेच्या स्नानासाठी झुंबड उडाली होती. मीही कपडे सहज दिसतील अशा जागी ठेवून, चंद्रभागेतच मुखप्रक्षालन व स्नान केले. घाट चढून वर आलो. देवळावरून जाताना जुना गाववाला पोलिस भेटला. रामरामीची देवघेव झाल्यावर त्याने अगत्याने विचारले, दर्शन झाले काय ? मी नुसता हसलो. 'कोणाची ओळख ना देख. माझे दर्शन कसे होणार ? काल तर लोकांच्या रांगा पाहून परत गेलो होतो.' शिपायाने फार आग्रह केला तेव्हा कोठल्यातरी दाराने आत गेलो. अजूनही इतक्या सकाळी पंढरीरायाचे दर्शन घेण्यासाठी मंडळी तिष्ठत होती. पोलिसदादा बरोबर असल्यामुळे थेट आतल्या गाभाऱ्यात गेलो. रंगशीला आणि गरुडखांब दिसू लागले आणि माझे मन मोहरून आले. थोडी रेटारेटी झाली आणि मग एकदम मूर्तीच्या सम्मुख आलो. भगतगणांच्या रंगासारखाच सावळा रंग, कमरेवर ठेवलेले हात आणि 'युगे अठ्ठावीस' विटेवर जुळविलेले समचरण दृष्टीस पडले. शेजारी असलेला बडवा 'चला–चला' असे ओरडला तेव्हा भानावर आलो. मोठ्या भक्तिभावाने विठ्ठलाच्या चरणावर मस्तक

ठेवले. कोणत्यातरी अनामिक भावनेने डोळे काठोकाठ भरून आले. दुसऱ्या दारातून बाहेर पडलो. रुक्मिणीमातेचे दर्शन घेऊन राऊळाच्या बाहेर आलो. यात्रा फुटू लागली होती. पताका मागे वळल्या होत्या. वारकऱ्यांनी पाठ फिरविली होती. पंढरीरायाचे शिखर उन्हात तळपत होते !

आज पुन्हा विद्यापीठाच्या कामासाठी महाविद्यालयात अकरा वाजता रुजू व्हावयाचे होते. लगबगा चालत गाडगेबाबांच्या मठाकडे आलो. मठ आता रिकामा झाला होता.

खाली चौकातल्या विठ्ठलासमोर कोणीतरी वीणा घेतलेला भक्त आळवून आळवून म्हणत होता,

' गोपाला, गोपाला, देवकीनंदन गोपाला... '

त्याचा आवाज तेवढा कानांवर येत होता. बाकी सगळे निवांत झाले होते. समुद्राची ओहोटी सुरू झाली होती !

' वारी घडली ' असे समाधानाने मनाशीच पुटपुटत इतर कामाला लागलो. ○

## □ अमेरिकेत संस्कृतचे वाढते प्रेम

अमेरिकेतील शिकागो विश्वविद्यालयात दक्षिण आशियायी भाषा व संस्कृती या विभागांचे प्रमुख असलेले व पुण्याला राहून संस्कृतचे अध्ययन केलेले डच पंडित डॉ. व्हॅन बुटेनेग यांनी परवा भारत–भेटीत अशी माहिती दिली की, अमेरिकन लोकांना संस्कृतबद्दल " विलक्षण " प्रेम वाटते व ते सारखे वाढतच आहे. सध्या शिकागो विश्वविद्यालयात तीस विद्यार्थी शिकत आहेत. याहून अधिक आश्चर्याची गोष्ट म्हणजे शिकागो विश्वविद्यालय इ. स. १८९२ साली स्थापन झाले, तेव्हापासूनच तेथे संस्कृत शिकविण्यात येत आहे. मेल या दुसऱ्या अमेरिकन विश्वविद्यालयात तर १८५० पासून संस्कृतचा विभाग आहे. हे खरोखरीच नवल नाही का ? उत्तर : अमेरिकेला भारताबद्दल बौद्धिक स्वारस्य केवढे वाटते, ते भारतीयांच्या ध्यानी आलेले नाही.

उलट भारतात संस्कृत अध्ययनाचा ऱ्हास होत चालला आहे, ही खेदाची गोष्ट आहे. " संस्कृत अध्ययनाची सर्व पद्धतच नष्ट होऊ पाहात आहे. प्रत्यक्ष संस्कृतचे पंडितदेखील आपल्या मुलांना या मार्गाला लावीत नाहीत. परिणामतः एक अत्यंत महत्त्वाची बौद्धिक परंपरा खंडित होत चालली आहे. संस्कृतचे अध्ययन ही शिक्षणाच्या क्षेत्रात एकच खरीखुरी ' अपाश्चिमात्य ' परंपरा शिल्लक राहिली आहे. माध्यमिक शाळांमधून संस्कृत शिकविणे एवढे अवघड का वाटावे, हे मला समजत नाही. भारताने जर संस्कृतकडे दुर्लक्ष केले, तर त्याचा परिणाम विचार–दारिद्र्य पसरण्यात होईल, हे विसरता कामा नये. "

# बसमध्ये भेटलेली मुलगी

य. सं. कर्णिक

बसने खोदादाद सर्कल सोडले आणि ती किंग्ज सर्कलच्या दिशेने ती धावू लागली.

सकाळची दहा–साडेदहाची वेळ. ' बेस्ट ' च्या नियमाप्रमाणे उभे प्रवासी धरून बसच्या सर्व ' सीट्स ' भरलेल्या होत्या. कंडक्टर नियमांचे काटेकोरपणे पालन करणारा असावा. पुढचा स्टॉप येताच त्याने दोन घंटा मारल्या. ब्रेकवरचा पाय सैल करून ड्रायव्हरने ॲक्सिलरेटरवरचा पाय दाबला. रस्त्याच्या कडेला आलेली बस, देवळाच्या पायरीला स्पर्श करून बाहेरच्या बाहेर सटकणाऱ्या आधुनिक भक्ताप्रमाणे, पुन्हा मध्यावर येऊन वेगाने धावू लागली.

तेवढ्यात सौजन्यमूर्ती कंडक्टर घसा खाऊन ओरडला,

" बेवकूफ छोकरी ! मरनेका ह क्या ? "



माझ्या सीटवरून वळून मी दरवाजाकडे पाहिले. स्कर्ट घातलेली एक शाळकरी पोरगी उडी मारून बसमध्ये चढली होती. तिच्या एका हातात पुस्तकांची चवड होती. दुसऱ्या हाताने तिने बसचा दांडा घट्ट पकडला होता. घामाने डवरलेला तिचा चेहेरा त्या वेळी दव पडलेल्या कोवळ्या रोपट्याप्रमाणे सतेज आणि मुलायम दिसत होता.

कंडक्टरने एक घंटा दिली. ड्रायव्हरने क्षणार्ध आश्चर्याने मागे पाहिले आणि ब्रेकवर पाय दाबला. बस रस्त्याच्या अगदी मध्ये उभी राहिली.

" उतर जाव," कंडक्टर खेकसला.

तिच्या डोळ्यांत भीतीची एक अस्पष्टशी रेषा उमटली. ओठावर ओठ घट्ट दाबून तिने मानेनेच उतरायला नकार दिला.

" उतर जाती है के नही ? " कंडक्टर दरवाजाकडे अंगुलीनिर्देश करीत ओरडला.

" नाही उतरणार जा. " ती निश्चयाने म्हणत बसमध्ये आणखी आत शिरली.

बसमधील प्रवासी हसले. तिच्याकडे कौतुकाने पाहू लागले. बसमागे मोटारींची रांग उभी राहिली होती. हॉर्नवर हॉर्न वाजू लागले. कंडक्टरने हार खाल्ली आणि रागातच दोन घंटा मारल्या. ड्रायव्हरने सुटकेचा निश्वास टाकून बस सुरू केली.

थोड्या वेळात पुढचा बसस्टॉप आला आणि माझ्या शेजारी बसलेला मनुष्य उठला. त्या जागेवर ती मुलगी पटकन येऊन बसली. तिने स्कर्ट सारखा केला, पुस्तके मांडीवर ठेवली आणि मग माझ्याकडे वळून ती मंदशी हसली.

" असं धावत्या गाडीत चढू नये, " मी समजावणीच्या सुरात म्हणालो.

" मी रोजच चढते तशी. मला किनई फार आवडतं उडी मारून चढायला."

मी तिला अपादमस्तक न्याहाळले. तेरा–चौदा वर्षांची ती चुणचुणीत छोकरी मला उसळत्या तारुण्याचा मनोहर आविष्कारच वाटली.

ती सडपातळ, उंच आणि सुंदर होती. यौवनाच्या आकर्षक खुणा नुकत्याच कोठे तिच्या शरीरावर उमटू लागलेल्या होत्या. किशोरावस्था आणि तारुण्य यांच्या वळणावर उभी असलेली ती बाला मला फार मोहक वाटली. पण मला सर्वांत आवडला तो तिचा धीटपणा. तिच्या वयाच्या इतर मुलींहून ती मला अगदी वेगळी भासली.

" असं करता करता केव्हांतरी धडपडशील हं. पाय मोडून घ्यायचाय का ? " मी गंभीरपणे विचारले. यावर ती मनमोकळेपणाने हसली आणि म्हणाली,

" लाँगजंप–हायजंपमध्ये पाय मोडत नाही आणि बसमध्ये उडी मारताना मोडतो काय ? "

हा युक्तिवाद मला निरुत्तर करण्यास पुरेसा होता. पण एका चिमुरड्या पोरी-कडून मी सहजासहजी हार कशी खाईन ? मीही हसत म्हटले,

" बस धावत असते. तुझ्या हायजंप–लाँगजंपमध्ये जमीन स्थिर असते ना ?"

पण ती लबाड मला बोलण्यात दाद देईल ? माझा मुद्दा खोडून काढत ती म्हणाली,

"धावणाऱ्या घोड्यावर उडी मारून चढत नाहीत ? मग बसमध्ये का चढता येऊ नये ? मला चांगलं जमतं ते. "

आता मात्र मी पुरा निरुत्तर झालो. तिच्याकडे कौतुकाने पाहात म्हणालो,

" तुझ्या आई-वडिलांना तुझी रात्रंदिवस काळजीच वाटत असली पाहिजे."

तेवढयात किंग्ज सर्कल आले आणि मी खाली उतरलो.

मग दिवसभर मला ती बसमध्ये भेटलेली मुलगी सारखी आठवत होती. बसमधून खाली उतरताना ती अशीच उडी मारून उतरली असेल का? उडी मारताना तिला जिवाची यत्किंचितही भीती वाटत नाही? इतकी बेदरकार वृत्ती तिच्यात कोठून आली? या वयात मुले अवखळ असतात. पण मुलीसुद्धा तशा असतात का? की जीवनाकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोन तिच्या वयाच्या इतर मुलींहून वेगळा असेल?

दुसऱ्या दिवशी ती मुलगी पुन्हा मला बसमध्ये भेटली. गर्दीतून वाट काढीत ती माझ्या जवळ आली नि पुस्तके सावरीत सीटच्या कडेला टेकून उभी राहिली. मी तिला म्हटले,

"आजही कालच्यासारखीच बसमध्ये चढलीस की काय?"

गुलाबाच्या नुकत्याच उमललेल्या कळीसारखी ती गोड हसली आणि मानेने ड्रायव्हरकडे निर्देश करीत म्हणाली,

"त्याने आज चान्स दिला नाही. गाडी थांबवली. घाबरला बिचारा."

मी थोडा उजवीकडे सरकलो आणि तिला विचारले,

"बसतेस?"

संकोचाची खार तिच्या डोळयांतून क्षणभर बाहेर डोकावून निघून गेली. मी करून दिलेल्या जागेवर टेकत त्या मुलीने म्हटले,

"या बसमध्ये केव्हाच जागा मिळत नाही बसायला."

तिचा निष्कपट चेहेरा पाहून मला तिची कणव आली. मी तिला विचारले,

"नाव काय तुझं?"

"सुलभा" ती म्हणाली.

"वडिलांचं?"

"अनंत."

"आडनाव?"

"लिखिते."

मी हसत म्हणालो, "पहिल्याच प्रश्नाला पूर्ण नाव सांगितलं असतंस तर तीन प्रश्न विचारायचा त्रास घ्यावा लागला नसता मला."

यावर ती गुदगुल्या झाल्यासारखी खळखळून हसली आणि म्हणाली,

"सॉरी! जेवढं विचारलं तेवढयाचंच उत्तर देत जा असं कालच बजावलंय मला मास्तरांनी."

"छान!" मी म्हणालो. "म्हणजे तुझी उत्तरंसुद्धा उडया मारत असतात वाटतं तुझ्यासारखी?"

त्यानंतर सुलभा लिखिते मला अनेक वेळा बसमध्ये भेटली. तिचा स्टॉप आला

की मी अधीरतेने तिची बसमध्ये चढण्याची वाट पाहू लागलो. ती दिसली नाही की निराश होऊ लागलो. ती सहप्रवासिनी जणू माझी जिवाभावाची मैत्रीणच होऊन राहीली. एक अतूट असं नातं आमच्यामध्ये निर्माण झालं. त्या नात्याला अपेक्षेचे, सलगीचे, विकृत भावनांचे बंध नव्हते. पोवळ्यांच्या शुभ्र मण्यासारखं निर्मळ असं ते नातं म्हणजे दोन विषमवयीन आणि अर्धपरिचित माणसांची मने जोडणारी एक अदृश्य शलाकाच होती जणू.

सुलभा लिखिते बसमध्ये सरळ शांतपणे चढलेली मी कधी पाहिली नाही. 'क्यू' मध्ये उभी असली तर बस आल्याबरोबर ती रांग तोडून पुढे यायची. बऱ्याच वेळा ती 'क्यू' पासून अलीकडे बऱ्याच अंतरावर उभी राहायची आणि बस पुरी थांबण्यापूर्वीच उडी मारून आत चढायची. एक दोन वेळा कंडक्टरने तिला खाली उतरायला भाग पाडले होते. माझ्या रदबदलीचा उपयोग नेहमी झालाच असे नाही. अशा वेळी मी खाली उतरून तिच्याबरोबर चालत किंग्ज सर्कलकडे जात असे. खूप मागे टाकलेल्या किशोरावस्थेचा आनंद तिच्या सहवासात पुनरपी उपभोगून घेत असे.

पावसाळा आला. मुंबापुरी सचैल न्हाऊन टवटवीत दिसू लागली. उष्म्याने त्रासलेल्या मुंबईकरांनी सुटकेचे निश्वास टाकले. मी काही त्याला अपवाद नव्हतो. पण त्यात एक प्रकारची हुरहूर मात्र मला वाटत होती. माझी उड्या मारणारी अवखळ मैत्रीण कोठे पाय घसरून तर पडणार नाही ना? तिला काळजी घेण्यासाठी मी रोज सुनवायचा. पण नाकाचा शेंडा उडवत ती म्हणायची,

"पडले तर पडले. रस्ता मोडेल एवढंच ना?"

एकदा बसमध्ये चिकार गर्दी होती. पाऊसही जोरात पडत होता. भिजलेली कबुतरे वळचणीला चिकटून बसावीत तसे बसमधील प्रवासी दाटीवाटीने बसले होते– उभे होते. सुलभा बसमध्ये केव्हा चढली ते मला कळले नाही. एक स्टॉप गेल्यानंतर दोन–चार माणसे उतरून गेली. मोकळ्या जागेचा फायदा घेऊन सुलभा मी उभा होतो त्या ठिकाणी आली आणि म्हणाली,

"काय गर्दी ही?"

ती पावसाने पूर्ण भिजली होती. केसातून पाणी ओथंबत होतं. ब्लाऊज अंगाला चिकटून बसला होता. मी थोडे रागावूनच म्हटले,

"छत्री आणायची नाही का? हे काय भिजणं झालं?"

स्कर्टची कडा पिळून त्यातील पाणी निथळत ती म्हणाली,

"घरातून निघाले तेव्हा नव्हता पाऊस."

"पावसाळ्यात छत्री नेहमी जवळ असावी."

"मला भिजायला अतिशय आवडतं," ती म्हणाली.

ही मुलगी वेडी तर नाही अशी शंका माझ्या मनाला चाटून गेली. पण तिच्या

निरागस चेहेऱ्याकडे पाहिल्यानंतर ती शंका हिरव्या सरड्यासारखी सुरकन अदृश्य झाली.

" तुला धावत्या बसमध्ये चढायला आवडतं; पावसात भिजायला आवडतं. तू एक अजब मुलगी आहेस. "

त्या दिवशी झालेली तिची-माझी बसमधील अखेरची भेट. त्यानंतर ती मला बसमध्ये भेटली नाही. अजून भेटलेली नाही.

रविवारी सकाळी मी वर्तमानपत्र चाळत बसलो होतो. अचानक एक बातमी माझ्या वाचनात आली.

बसच्या अपघातात जखमी.

काल सायंकाळी कुलावा ते किंग्जसर्कल मार्गावर धावणाऱ्या बसचा एका किशोरीस धक्का लागून मी जखमी झाली. शीव हॉस्पिटलात तिच्यावर उपचार चालू असून तिची प्रकृती सुधारत आहे असे कळते.

ती बातमी वाचताच माझ्या हृदयात चर्रर्र झाले. सुलभा लिखिते तर अपघातात सापडली नाही ना ? जखमी झाली म्हणजे काय झाले असेल ? पाय मोडला असेल का ? डोके फुटले असेल का ? नाना विचार मनात येऊ लागले. चैन पडेना. शेवटी हॉस्पिटलात जाऊन चौकशी करावयाचे मी ठरवले.

अस्वस्थ मन:स्थितीतच मी शीव इस्पितळाच्या पायऱ्या चढलो. जखमी झालेली


काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे

अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

के. टी. डोंगरे अॅण्ड कं., प्रा. लि.,

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

डोंगरे बालामृताचे

मुलगी सुलभाच असेल का ? आणि असेल तर कोणत्या स्थितीत ती माझ्या दृष्टीस पडेल याची हुरहूर मनात ठेवून मी फीमेल वॉर्डमध्ये प्रवेश केला.

ती सुलभाच होती. तिचा एक पाय पुरा प्लास्टरमध्ये होता. डोक्याला बँडेज बांधलेले होते. तोंडावर ठिकठिकाणी पट्ट्या चिटकवल्या होत्या. तिला झोप लागलेली होती. पण झोपेतही तिचा चेहरा ताजा टवटवीत दिसत होता. वादळातही टिकून राहिलेल्या जास्वंदीसारखा.

शेजारी स्टुलावर एक मध्यमवयीन बाई बसली होती. ती बहुधा सुलभाची आई असावी. मला पाहून ती उभी राहिली. मी तिला विचारले,

" कसं आहे आता ? "

" बरं आहे. आजच जरा झोप लागलीय. "

" फ्रॅक्चर आहे का ?"

" होय. पाय अगदी निकामी झालाय. "

" चालायला येईल ना पुढे ? "

तिने एक उदासवाणा निश्वास टाकला आणि म्हटले,

" डॉक्टर म्हणतात येईल म्हणून. "

तेवढ्यात सुलभाला जाग आली. तिने माझ्याकडे पाहिले पण चटकन् ओळखले नाही. मी तिला विचारले,

" मला ओळखलं नाहीस, सुलभा ?"

संथपणे तिने माझ्याकडे पाहिले आणि क्षणभर मला वाटले हिची स्मृती हरवली की काय ? पण लगेच, ढगातून चंद्र अवचित बाहेर यावा तसे तिच्या ओठातून स्मित बाहेर डोकावले. क्षीण आवाजात ती म्हणाली,

" आता ओळखलं. "

रिकाम्या स्टुलावर टेकत मी म्हणालो,

" काय करून घेतलंस हे ? "

" तुम्ही म्हणत होता तसेच झाले. "

" काय ? "

" अखेर मी धडपडलेच. "

त्या मन:स्थितीतही मला हसू फुटले. मी म्हणालो

" पण हे झालं कसं ? तू तर उड्या मारण्यात इतकी पटाईत."

" मी एक नवीन प्रयोग करून पाहिला, " ती म्हणाली.

" कसला ? "

" भरवेगात चाललेल्या बसमध्ये उडी टाकून पाहिली. "

" उत्तम ! " मी उद्गारलो, आणि तिच्या आईकडे वळून म्हणालो,

" हिला शाळेत उगीच घातलीत तुम्ही. सर्कशीत पाठवायला हवी होती."

अर्धाएक तास गप्पा मारल्यानंतर मी तेथून निघालो. जाताना मी सुलभाच्या हातावरून हात फिरवला आणि म्हटले,

“ लवकर बरी हो. शाळा बुडली. पास व्हायचं आहे ना यंदा ? ”

पण तिचं माझ्या बोलण्याकडे लक्ष नव्हतं. ती काहीतरी विचार करीत होती.

“ कसला विचार करते आहेस ? ”

“ कसला नाही. ” ती म्हणाली.

“ मग गप्प का ? ”

“ मला तुम्हाला काही विचारायंचय्. ”

“ विचार. ” मी म्हणालो.

“ सगळे म्हणतात माझा पाय तुटलाय. खरं का ते ?”

मी सुलभाच्या आईकडे पाहिले. तिचे डोळे अश्रूंनी डबडबले होते.

“ छे, छे ! ” मी उत्तरलो.” विश्वास नको ठेवूस त्यांच्या सांगण्यावर. आता पंधरा-वीस दिवसांत तुझा पाय पूर्वीसारखा होईल. ”

मला माहीत होतं मी खोटं बोलतोय. सुलभाची, तिच्या आईची, एवढंच काय, माझी स्वत:चीही समजूत करतोय.

पण सुलभाचा चेहरा त्यामुळे एकदम फुलला. तिचे डोळे चमकू लागले. माझा हात पकडून ती म्हणाली,

“ खरंच ? मग बरं झालं बाई. डिसेंबरात किनई आमच्या शाळेचे स्पोर्टस् आहेत. मला वाटलं ह्या खेपेला माझी चँपियनशिप जाते की काय. ” ○


# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ क्रांतिकारक झोप

क्रांती करायला काय काय गोष्टींची जरुरी असते, याची सर्वसाधारण कल्पना करणे कठीण नाही. बॉम्ब तयार करायचे पुस्तक, गुप्त पत्रके छापायची व्यवस्था आणि इन्किलाब झिंदाबादसारख्या दोन–चार बुलंद घोषणा या तीन पायांवर साधारणपणे प्रत्येक क्रांती उभी राहते. पण क्रांतीची फॅशनदेखील आता बदलत चाललेली दिसते. उदाहरणार्थ, इतिहासकालीन फ्रेंच राज्यक्रांतीच्या परवाच्या आधुनिक आवृत्तीत पॅरीसमधल्या विद्यार्थी–वस्तीत एक अफलातून घोषणा पाहायला मिळाली–" दोस्त हो, दिवसातून पाच तास झोप आवश्यक आहे. क्रांतीला तुमची जरुरी आहे. " थोडक्यात म्हणजे " क्रांतीसाठी झोप काढा ! " आता बोला, कोण लेकाचा प्रतिक्रांतिकारक म्हणतो आराम हराम है ? खरं म्हणजे पॅरीसच्या जीवनात झोपेला फारसे स्थान नाही, हे सगळ्यांना माहीत आहे. तेव्हा पॅरीसमधल्या तरुणांनीच झोपेचा प्रचार करावा याचा अर्थ झोप हे आधुनिक क्रांतीचे एक प्रभावी हत्यार असले पाहिजे. आता पेकिंगच्या क्रांतिकारकांप्रमाणे पॅरीसचे क्रांतिकारकही आपला क्रांतिवाद परदेशी निर्यात करू लागले तर क्रांतीच्या या पॅरिशियन स्टाइलची जगावर अधिक " मोहिनी " पडण्याची शक्यता आहे. आपल्या हिंदुस्थानात तर या वाम (कुक्षी) पंथी क्रांतीचे हार्दिक स्वागत होईल. कारण झोपा काढून क्रांती होत असेल तर भाषणे द्यायचे कष्टदेखील घ्यायला नकोत. चला, जांभया यायला लागल्या–जरा क्रांती करावी म्हणतो.

## □ आक्रमणाची अनाक्रमक व्याख्या

कुठल्याही गोष्टीची व्याख्या करणे मोठे कठीण असते. उदाहरणार्थ, लहानपणी आमच्या भूमितीच्या पुस्तकात अशी अजब व्याख्या होती की, ज्याला लांबीही नाही व रुंदीही नाही तरी अस्तित्व आहे, त्याला बिंदू म्हणतात. आता अस्तित्व आहे पण आकार नाही, अशी गोष्ट कशी असू शकेल याचा आपल्या डोक्यात कधीच प्रकाश पडला नाही–म्हणूनच मला वाटते, माझ्या बाबतीत हताश झालेल्या मास्तरांनी " माझ्या डोक्याला आकार आहे पण अस्तित्व नाही " असा शेरा मारला असावा. भूमितीत अशी पण व्याख्या होती की, रेषेला रुंदी नसते, फक्त लांबी असते–कसं शक्य आहे ? उलट आमच्या शेजारच्या महिला मंडळात लांबी नसलेल्या, फक्त

रुंदीच असलेल्या बऱ्याच ऑफिसरणी अस्मादिकांनी पाहिलेल्या आहेत. तेव्हा हे व्याख्या कंत्राट आपल्यासारख्या सुमारबुद्धीच्या आवाक्यातले नाही, असे समजून मी तो नाद सोडला होता. पण आता असे दिसते की, व्याख्या करणे हे कर्मच महाकठीण आहे. कारण परवा वर्तमानपत्रात वाचले की, "आक्रमण" म्हणजे काय याची व्याख्या करण्यासाठी यूनोच्या आतापर्यंत चार बैठकी झाल्या, पण व्याख्या अजून जमलेली नाही.—आता बोला ! एका देशाने दुसऱ्या देशावर हल्ला केला की, त्याला आक्रमण म्हणायचे अशी मी सरळसोट व्याख्या केली असती—पण म्हणूनच मला यूनोच्या अध्यक्षपदापासून दूर ठेवण्यात आलेले आहे. कारण आक्रमणाच्या आक्रमक व्याख्येने पाकिस्तानसारख्या सन्माननीय यूनो—सदस्यांना राग नाही का येणार ? व्याख्या आक्रमणाची करायची असली तरी ती अनाक्रमक हवी—अन् तेच तर बेटे यूनोला जमत नाही असे दिसते.

## ☐ चक्रव्यूहाची औद्योगिक आवृत्ती

आपल्या तक्रारींकडे लोकांचे लक्ष वेधण्याचे अनेक शिष्टसंमत मार्ग आहेत. उदाहरणार्थ, "घेराव" ऊर्फ चक्रव्यूहाची आधुनिक आवृत्ती. अभिमन्यूप्रमाणे घेरला गेलेला कारखानदार अखेर नामोहरम होतो. संपावर जाणे म्हणजे काम न करणे हाही एक जुना मार्ग आहे. पण तो आता किती जुना झाला आहे याची नुकतीच कल्पना आली. परवा वर्तमानपत्रांत वाचले, कुठल्याशा गावी काही कारकुनांनी म्हणे असा निश्चय केला की, आपल्या तक्रारींची दाद लागेपर्यंत हातात आलेले प्रत्येक काम दहा मिनिटांच्या आत संपवायचे ! तुम्ही म्हणाल, ही निव्वळ थापेबाजी आहे. दहा मिनिटांत हातातली फाइल हातावेगळी करणारा कारकून (—अन् तेही चिरीमिरी न घेता) ही चीज प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही अजून घडविता आलेली नाही. एखाद्या कामाला जेवढा वेळ उपलब्ध असेल तेवढ्या वेळेपर्यंत ते काम लांबविण्यात येते, हा "पार्किन्सनचा नियम" जगातल्या यच्चयावत कारकुनांना शिरसावंद्य असताना अवघ्या दहा मिनिटांत काम उरकण्याचे धडधडीत नियमबाह्य वर्तन करायला आमचे हे कारकून धजले तरी कसे ? आणि हे निंद्य उदाहरण इतर तक्रारी करणाऱ्या मंडळींनी गिरविले तर काय अनवस्था प्रसंग येईल पाहा—विद्यार्थी बसगाड्या जाळण्याऐवजी निषेध म्हणून फर्स्ट क्लासमध्ये पास होण्यासाठी झटतील. कामगार पोलिसांशी मारामाऱ्या करण्याऐवजी रागारागाने उत्पादनाचा उच्चांक गाठतील. सरकारी बांधकामखात्याचे कंत्राटदार पैसे खाण्याऐवजी संतापाने कडक पथ्य करतील—म्हणजे फक्त वरणभात, भाजीपोळी खातील. आणि डॉक्टर रोग्यांना निजधामाला पाठवायच्या ऐवजी बरे करून निजधामाला म्हणजे स्वतःच्या घरी पाठवतील. ○

पुस्तके

संगत
श्री. ज. जोशी
श्रीराम प्रकाशन
किं. ६ रुपये

□ □

□ □

# रंगेल आणि रंगेल

फडके–खांडेकरी कथा गाडगीळ–माडगूळकर यांनी संपविली. गाडगीळ–माडगूळकरांची कथा खरी नवकथा होती; ती सर्व काही दोषांपासून मुक्त आहे अशी तिची प्रतिज्ञा होती. परंतु सरळ येऊन ती सिंहासनावर बसू शकली नाही. जुन्या पिढीच्या जुन्या लोकांचे तसेच जुन्या पिढीच्या नव्या लोकांचे तिच्याविषयीचे उद्‌गार मराठी साहित्यात वादंग माजविणारे होते. हे जसे होते तसेच नव्या पिढीच्या नव्या आणि नव्या पिढीच्या जुन्या विचारसरणीच्या लोकांतही या कथेविषयी वाद होताच. तरी पण ही नवी कथा ज्या विशिष्ट नेटाने, जोमाने, त्वेषाने, हिरिरीने, आक्रमकतेने मराठी साहित्याच्या मैदानात उतरली होती, तेवढीच या बाह्य लक्षणांपेक्षा किंवा लक्षणांइतकीच तिच्यातील आंतरिक गुणवत्ता मोठी.

हिच्यात निवेदनाची मालगाडी नव्हती, हिच्या कथावस्तूत चमत्कार नव्हता भाषेत ढोबळपणा किंवा कृत्रिमता नव्हती आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी होती, की हिच्यातील जीवनाने नेहमीच्या जीवनाशी फारकत करून घेतलेली नव्हती. म्हणजे वास्तवातील जीवन आणि कलेत व्यक्त झालेले जीवन यांच्या सीमारेषांना एकत्र सांधण्याचे फार मोठे कार्य या नवकथेने केले. मोकाशींच्या अगोदर अगोदरच्या काही कथा थोड्याशा अधिक रोमँटिक, वास्तवातून आदर्शाकडे किंवा चमत्कृतीकडे झुकणाऱ्या तरीही प्रामाणिकपणाची हमी देणाऱ्या आहेत. या फडके–खांडेकरी कथे-पेक्षा मोकाशींची पहिली कथादेखील अधिक सुजाण होती. 'दिवाळीची साधी गोष्ट', 'काय रानटी लोक आहेत!', 'हिरवी नोट', 'रेडिओची गोष्ट', अशी सरमिसळ मोकाशींच्या कथातून दिसते. परंतु गंगाधर गाडगिळांनी अशी सरमिसळ आपल्या प्राथमिक कथांमधूनदेखील होऊ दिली नाही. माडगूळकरांची कथा तर विलक्षण साधी, सरळ, तरीही नेमकी, आपल्या रूपाला कुठल्याही प्रकारच्या अलं-

□ □

□ □

# दोन कथासंग्रह

पुस्तके

सूर्य
श्री. दा. पानवलकर
मौज प्रकाशन गृह
कि. ७–५० रुपये

काराचा सोस लागू न देणारी आणि आशयाचे रूप कलात्मक पातळीवर अगदी सहजतेने घेऊन जाणारी होती. अरविंद गोखले यांच्या कथेची प्रकृती निराळी होती. तिची चण वेगळी होती. आशय सिद्ध करण्यापासून त्याला कलेचे रूप देण्यापर्यंतची गोखले यांच्या प्रतिभेची प्रक्रिया निराळी होती. परंतु त्यांच्या कथेनेदेखील आपले नाते फडके– खांडेकर घराण्याशी सांगितले नाही.

त्या काळात जसे गाडगीळ, गोखले, माडगूळकर, भावे, मोकाशी होते तशीच लेखकांची आणखी एक मोठी पिढी त्यांच्या मागे पुढे होती. ते म्हणजे य. गो. जोशी, लक्ष्मणराव सरदेसाई, रा. भि. जोशी, प्रभाकर पाध्ये, वामन चोरघडे, शांताराम इ. हे ते लेखक होत. या लोकांनी मराठी कथा वीस वर्षे गाजविली. आणि नंतर पुन्हा ही गाडगीळ–माडगूळकरी कथा थकली, वयस्कर झाली, जुनाट दिसू लागली; तरी पण ती संपली नाही !

आणि तेथून पुढे मराठी कथेची तिसरी पिढी सुरू झाली. या तिसऱ्या पिढीचा पहिला नारळ जी. ए. कुलकर्णी यांनी फोडला. त्यांची 'गुंतवळ', 'राणी', 'पडदा', 'दुःख नावाचे जहाज', 'कांकणे', 'तुती', 'वस्त्र' कितीतरी कथा आपल्या नव्या, खोल आशयाने उभ्या राहतात. त्यांच्या कथेतील प्रत्येक वाक्य हे चैतन्याच्या बेटाप्रमाणे सळसळत असते. आणि त्यानंतर कथालेखकांची एक झुंडच्या झुंडच दृष्टिसमोर उभी राहते. ही कथा इंद्रधनुष्याप्रमाणे आकाशाला लटकूनदेखील क्षितिजावर घट्ट पाय रोवून बसलेली दिसते. तिच्या लेखकांमध्ये विद्याधर-पुंडलिक, तेंडुलकर, नाडकर्णी, पदकी, विजया राजाध्यक्ष, कमल देसाई, सरिता पदकी, तारा वनारसे, आनंद यादव, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, शं. ना. नवरे, कर्णिक, जयवंत दळवी, चिरमुले, श्री. ज. जोशी आणि श्री. दा. पानवलकर इ..

या गाडगीळ–माडगूळकरी कथेनंतर कथाविश्वाला समृद्ध करणारी जी कथा पुढे आली ती अनेक दृष्टींनी संपन्न आहे. उदा. द. मा. मिरासदार हा लेखक घेतला तर ग्रामीण विनोदी कथेची यशस्वी सुरुवातच त्यांच्यापासून झाली असे म्हणावे लागते. शंकर पाटील यांनी ग्रामीण जीवनाच्या कक्षा अधिक रुंद केल्या. ग्रामीण असूनदेखील त्यांनी आपल्या काही कथांना काव्याची लय प्राप्त करून दिली आहे. तिला नाट्याचे फार वेड आहे आणि त्यामुळे आशयाला कृत्रिमता येते हे जरी खरे असले तरी या अपयशातूनदेखील त्यांच्या कथेने यशाकडे वाटचाल केलेली दिसते. त्यानंतर, ग्रामीण जीवनाचा स्वभावधर्म न झाकता त्याला खरे कलात्मक सौंदर्य प्राप्त करून देण्याचे मोठे काम आनंद यादव करीत आहेत.

## चाकोरीबाहेरील सूर्य, परदुःख...

अशा रीतीने पुढच्या पिढीतील प्रत्येक लेखक आपापल्या विविध व्यक्तिमत्त्वाप्रमाणे मराठी कथेत विविधता आणि कसदार निराळेपण आणीत आहे. अशाच लेखकांपैकी दोन कथालेखकांचे संग्रह आज माझ्यापुढे आहेत. श्री. दा. पानवलकर आणि श्री. ज. जोशी यांचे 'सूर्य' आणि 'संगत'. विषयाच्या दृष्टीने विविधता या दोन्ही संग्रहांमध्ये आहे. परंतु पानवलकर ज्या जीवनाचे चित्रण करतात ते जीवन चाकोरीबाहेरचे आहे. तसे 'संगत' मधील जीवनाचे नाही. संगत कथेत ज्या व्यक्ती आहेत त्या तुमच्या आमच्या परिचयाच्या आहेत. त्या व्यक्तींच्या जीवनात निर्माण झालेले प्रश्नही फारसे नवीन नाहीत. ही गोष्ट पानवलकरांच्या कथेच्या बाबतीत नाही. त्यांच्या संग्रहातील पहिलीच कथा 'सूर्य', घ्या किंवा 'ओ पास्कल', 'परदुःख', 'ट्रायल', 'रिकामा प्याला' घ्या. या सर्व कथांमधील कथावस्तू चाकोरीबाहेरची आहे. तशीच ती कणखर आहे, पीळदार आणि रगेलही आहे. गाडगीळ–माडगूळकरी कथेच्या काळात (ती जरी नवी आणि प्रामाणिक होती तरी) मानवी जीवनाची अशाश्वता, जीवनातील भकासपणा, यंत्रयुगाने आणलेले बकाली रूप, गरिबीचे–दारिद्र्याचे तत्त्वज्ञान करण्याचा ध्यास (किंवा हव्यास) तसेच मोठमोठ्या शहरांतून (म्हणजे मुंबईत) माणसांच्या थव्यात गुंतून पडलेल्या जीवनाचा व्याकुळ करणारा तुरुंगवास आणि या साऱ्यांचे एक तत्त्वज्ञान करून केलेला आणि कथेला महात्मता आणून देण्याची ईर्षा प्राधान्य पावली होती. भावे काय, गोखले काय, गाडगीळ काय, आणि माडगूळकर काय, हे लोक एका विशिष्ट तत्त्वज्ञानाने बांधले गेले होते. अर्थात हा जसा गुण तसाच तो दोषही आहे याची जाणीव कलावंताजवळ असायलाच हवी. मोकाशींच्या पहिल्या पहिल्या कथा अशाच गुण–दोषांनी भारलेल्या आहेत. परंतु फार लवकर मोकाशींची प्रतिभा या खोड्यातून मुक्त झाली आणि शाश्वत जीवनमूल्यांच्या शोधात खोल जाऊन ती आपल्या कथा लिहू लागली. त्यांचे 'लामण दिव्या'

नंतरचे कथासंग्रह या दृष्टीने अभ्यासण्यासारखे आहेत. हीच गोष्ट आणखी एका कथालेखकाच्या बाबतीत सांगता येईल. ते कथालेखक श्री. ज. जोशी होत. आणि याच परंपरेची कथा श्री. दा. पानवलकरांचीही आहे असे मी समजतो. श्री. ज. जोशींनी आपल्या पहिल्याच 'पांढरपेशाचे जग' या कथासंग्रहात ही गुलामगिरी दाखविली आहे. तो कथासंग्रह विलक्षण गाजला हेही त्याचेच कारण. आज 'शिवसेना' ज्यामुळे गाजत आहे तेच तत्त्व कलाविष्कारालाही लागू पडत असते. द. रा. कवठेकरांच्या कथा त्या काळी फारच गाजल्या आणि पुढे निष्प्रभ ठरल्या, त्याच्याही मुळाशी हेच कारण आहे. भाव्यांनीही तेच केलेले आहे. या लोकांनी अमाप यशही मिळविले. परंतु शेवटी काळाच्या चौकटीत ते यश आणि त्यांची कला बंदिस्त होऊन पडली. श्री. ज. जोशींनी मात्र तसे होऊ दिले नाही. म्हणूनच गाडगीळ–माडगूळकर यांच्या पूर्वीपासून ते लिहीत असून त्यांच्यानंतरही ते लिहीत राहिले आहेत; इतकेच नव्हे तर त्यांच्या लेखनाला नित्य नवी नव्हाळी प्राप्त होत आहे! त्यांचे 'सुलमा', 'मामाचा वाडा', 'समज' आणि 'संगत' हे कथासंग्रह त्या दृष्टीने पाहण्यासारखे आहेत.

पानवलकरांची गोष्ट तर श्री. ज. जोशींहूनही निराळी आहे. त्यांच्या कथेने सुरुवातच मुळी मुक्तपणे केलेली आहे. ते जीवनाच्या कुठल्याच तत्त्वज्ञानाच्या आहारी जात नाहीत. फुलपाखरू एकाच एक फुलावर जसे कधीच रमत नाही तशीच प्रतिभा पानवलकरांची आहे. त्यांचे तिन्ही कथासंग्रह याच जातीचे आहेत. कसल्याही विशिष्ट जीवनाची पताका न लावतादेखील पानवलकर जीवनाची खोल अनुभूती कलाबद्ध करू शकतात. त्यांची शैली कथेच्या आशयानुरूप आपले रूप बदलीत असते. वेगवेगळ्या स्तरांवरील जीवनाचे नाट्य चित्रित करण्याची जशी पानवलकरांच्या कथेला ओढ आहे तसेच या नाट्याला जीवनावर आक्रमण करू न देण्याइतका समज त्यांच्या कलेला आहे. म्हणूनच त्यांची कथा जशी निरनिराळ्या जुन्या संकेतांपासून मुक्त आहे तशीच त्यांची कलाही जुन्या वाङ्मयीन तत्त्वज्ञानाच्या लगामापासून मुक्त आहे. पानवलकरांच्या प्रतिमेतला हा मोठा गुण असल्यामुळे त्यांची कथा कधी शिळी, जुनी, जखडलेली, अकाली प्रौढ झालेली किंवा तत्त्वज्ञानाचा चष्मा डोळ्यांवर लावून बसलेली दिसणार नाही.

अर्थात गुणांप्रमाणेच तिच्यात दोषही आहेत. उदा० त्यांच्या प्रतिमा बेढब असतात. अविनाशी कलेला प्रतिमा या लोढण्यासारख्या असतात असे माझे मत आहे. त्यातून ज्या प्रतिमा शब्दांच्या शिळा होऊन पडतात त्यांच्याविषयी काय बोलावे? अशा फसलेल्या प्रतिमांची काही उदाहरणे देतो.

'त्याच्या निवडुंगाच्या बोंडासारख्या डोळ्यांची फिरत श्वापदासारखी. (सूर्य. १)'

'बापाचं प्रत्येक वाक्य लोखंडी गज ठोकल्यासारखं. (सूर्य ५.)'

'......लाल शेणानं सारवल्यासारखी डोळ्यांपुढून सरकून गेली. (रिकामा प्याला १८६.)'

'स्मृतीला गलोलीसारखा ताण दिला. (रिकामा प्याला १९२.)'

प्रतिमा या विषयाच्या वेगवान धारेला आणि आशयाच्या सच्चा अभिव्यक्तीला अडथळा आणतात. अर्थात प्रतिमांच्या चुकीच्या किंवा अतिरिक्त वापराबद्दल मी हे म्हणत आहे हे लक्षात घ्यावे. वेषभूषेतील अचूक रंगसंगती जशी शरीराच्या मूळ सौंदर्यात बाधा न आणता त्याला खुलावटच आणते तसेच प्रतिमांचे आहे एवढे सांगितले म्हणजे पुरे.

## निवेदनातील साधेपणा

अर्थात श्री. ज. जोशींची कथा आपल्या निवेदनात अशा प्रतिमांच्या आहारी जात नाही. उलट त्यांची शक्ती जर काही असेल तर ती म्हणजे त्यांचा निवेदनातला पराकाष्ठेचा साधेपणा. 'संगत' मधील त्यांच्या सर्वच कथा विशेषत: 'मात' या दृष्टीने आदर्श कथा आहेत असे म्हणावे लागेल. 'मात' या कथेचा विषय इतका भडक, नाट्यमय; परंतु कथावस्तूचे मूळचे सौंदर्य स्वच्छ आणि पारदर्शक व्हावे म्हणून जोशी यांनी कथेच्या निवेदनात कमालीचा साधेपणा आणलेला आहे. नवरा–बायको आणि मुलगी यांची सामुदायिक आत्महत्या, अशा आत्महत्येला दुसऱ्या बायकोने दिलेला नकार आणि हे सत्य बाहेर पडल्यामुळे मित्रावर झालेली मात असा या कथेचा विषय आहे. तीच गोष्ट 'वृंदावनच्या मामी' या कथेची आहे.

ही मामी बालविधवा आहे. खेडेगावातल्या इनामदारांची बहीण. मानमरातबात वाढलेली, पुरुषासारखी जहांबाज. परपुरुषाचा वाराही अंगावरून गेला नाही अशी ही सडसडीत विधवा. या मामींच्या आयुष्यातला शेवटचा काळ या कथेत आलेला आहे. वृद्ध मामी. इनामदारी वैभव नष्ट झालेलं. एवढ्या मोठ्या वाड्यात सगुणा (विधवाच) आणि ही मामीच राहात होत्या. पुरुषाबरोबरच्या क्रीडेचा, रतिसुखाचा मुळीच अनुभव नसलेली गिर्रेबाज विधवा श्री. जं. नी उत्तम उभी केली आहे. वळचणीच्या तुळईवर एक नागाचं युगुल रतिक्रीडा करीत असता इतर पुरुष लोक भिऊन पळून जातात आणि विधवा मामी एकटक ती रतिक्रीडा बघत राहते. खेळत खेळत ते जोडपे बाहेर अंगणात जाते आणि क्रीडा संपवून गलितगात्र होऊन घळमटून स्तब्ध पडते; तेवढ्यात मामी त्यांच्यावर काठीचे घाव घालून त्यांना संपविते. या चित्रणात कथेचा आत्मा आणि तिचे यश सामावलेले आहे.

साध्या भाषेतली त्यांची छोटी छोटी वाक्येदेखील विलक्षण अर्थवाही होतात आणि कथेचे वजन वाढवितात. मोठ्या वाड्यातील (खेडेगावातल्या) रात्रीचे वर्णन करताना ते असे एक वाक्य लिहितात, "त्या मोठ्या वाड्यात अपुऱ्या प्रकाशामुळे सावल्या भिंतीवरून इकडे तिकडे जायला लागल्या" तसेच, "रात्रीची शांतता आम्हा सर्वांच्याच अंगात भिनत चालली होती." अशी ही वाक्ये.

मात्र कथावस्तूच्या संपूर्ण आशयाचे रूप सिद्ध करताना श्री. ज. काही वेळा, नको असताना जे उपाय योजतात त्यामुळे त्यांची कथा कृत्रिम होते. ' वृंदावनच्या मामी ' मध्येच सवाष्ण बाई पाहुणी येते आणि कंगवा, कुंकवाची बाटली विसरून येते. कशाकरिता तर विधवा मामींकडे हे साहित्य आहे हे दाखविण्यासाठी ! तसेच एके ठिकाणी ही मामी म्हणते, ' ...... स्मशानात असावी तशी शांतता घरात पसरली. ' (!) कित्येक ठिकाणी निवेदनाच्या ओघात दिसणारा हा बेसावधपणा सोडला तर श्री. ज. जोशी यांची कथा चिरयौवना आहे.

अशी ही कथा लेखकांच्या तिसऱ्या पिढीची कथा विविध रूपाने वाचकांपुढे येत आहे. तिच्यांतून व्यक्त होणारे जीवन समाजाच्या सर्व थरांतून येत आहेत आणि अनुभवांच्या वेगवेगळया पातळयांवरून ते रूप घेत आहे. आशयाच्या, निवेदनाच्या, शैलीच्या आणि घाटाच्या बाबतीत तिने मागच्या दोन्ही पिढ्यांपेक्षा निश्चितच अधिक यश मिळविले आहे.

— वि. शं. पारगावकर


ज्वलंत राष्ट्रवादाच्या
भयानक दीप्तीचा
ललितभव्य आलेख

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

**रा. म. शास्त्री**
मूल्य पंचवीस रुपये

' माणूस ' मधून प्रसिद्ध झालेल्या
प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

राजहंस प्रकाशन,
४१९ नारायण पेठ, पुणे २.



# पुरंदरच्या बुरुजावरून

वादळ रोरावत होतं. दर्या थैमान घालीत होता. लाटा तटावर आपटत होत्या. फेस उसळत होता. वारा एवढा तुफान होता की, एकमेकांना एकमेकांचा शब्द ऐकू येत नव्हता. मुरूडचा जलदुर्ग वादळाला टक्कर देत उभा होता. जलदुर्गातील नारळी पोफळी करकरा लवत होत्या. झावळीची झळ झळ किल्ल्यात कोंदली होती.

मुरूडचा जलदुर्ग किनाऱ्यापासून तुटून दूर एकटा पडलेला होता. अष्टमीच्या चंद्रासारख्या आकाराच्या बेटावर हा दुर्ग उभा होता. भवताली खोल खोल अथांग समुद्र आणि वर निळं निळं आस्मान. हा जलदुर्ग असा एकटा अलिप्त होता हेच त्याचं सामर्थ्य होतं. शत्रू ह्या जलदुर्गावर उतरणं अशक्य होतं.

देवगिरीचं यादवराज्य बुडालं. महाराष्ट्रातले लहानमोठे सामंतही बुडाले. जे उरले ते सुलतानाचे गुलाम बनले. सह्याद्री बहमनी सुलतानांच्या टाचेखाली गेला. पण मुरूडचा जलदुर्ग मात्र अजिक्यच राहिला. कोकणच्या कोळ्यांनी या जलदुर्गावर आपला झेंडा स्वतंत्रपणे फडकत ठेवला. सुलतानांनी हा सागरी किल्ला जिंकण्यासाठी आकाशपाताळ एक केलं. पण त्यांना हे समुद्राचं लेकरू जिंकता आलं नाही. कोळ्यांच्या शौर्यसागरापुढं आणि कोकणच्या अथांग समुद्रापुढं सुलतान पराभूत झाले. जलदुर्गावरील कोळी दर्याभवानीच्या पदराखाली सुखरूप राहिले.

# आत्मघात!

ब. मो. पुरंदरे

बेदरच्या एवढ्या प्रचंड सुलतानी सामर्थ्यालाही ओहोटीच्या लाटेसारखं मागं मागं हटावं लागलं.

इ. स. १४८५ साल उजाडलं. स्वत: सुभेदार मलिक महंमद अफाट दळबादळ घेऊन मुरूडच्या किनाऱ्यावर येऊन उतरला. नाचऱ्या दर्यात जलदुर्ग हसत हसत सुलतानी सैन्यावर चुळा टाकीत होता. जलदुर्गाचा दुर्गाधिपती होता राम कोळी.

वास्तविक हा जलदुर्ग त्या वेळी पक्क्या तटाकोटांचा बांधलेला नव्हता. मोठमोठ्या लाकडी तुळवटांची तटबंदी उभी होती. लाकडांचाच भक्कम दरवाजा होता. मलिक महंमद आला, त्याने तारवे तराफे गोळा केले. त्यातून त्याचे सैन्य वल्ही मारीत जलदुर्गावर चाल करून निघालं. जिहादचा पुकारा होत होता. लाकडी तटबंदी पेटविण्यासाठी मोठमोठे पलिते ढणाणत होते. गवताच्या गंजी तयार होत्या. आरोळ्यांनी आस्मान दणाणलं होतं. शहाजणे वाजत होती. जलदुर्गावर तीन बाजूंनी सुलतानी तारवे सुसरीसारखे चाल करून निघाले होते. जलदुर्गावरचे जवान कोळी तीरकमानी ताणून तटावर उभे होते. त्यांचेही ढोल ढमामत होते. एकवीरा भवानीचा उदोकाराच्या गर्जना घुमत होत्या. जलदुर्गाधिपती राम कोळी स्वत: इशारे देत होता.

हल्ला जवळ आला. जळते पलिते धनुष्याला लावून सरासर सुटू लागले.

लाकडाच्या तटात खचाखच ते जळते बाण घुसू लागले. वरून सुटलेले जळते बाण सुलतानी तारव्यांवर पडू लागले. आरोळ्या किंकाळ्यांनी समिंदर डचमळू लागला. तटात घुसलेले बाण विझविण्यासाठी कोळणी तटावरून घागरी ओतू लागल्या. गलबतावरच्या गंजी पेटल्या. राम कोळ्याच्या मर्दांनी बाणांचा अन् गोफणगुंड्यांचा असा मारा केला की, सुलतानी हशम टचाटच मरू लागले. पेटती गलबते दर्यावर भरकटली गेली. हशम आगीत होरपळून दर्यात उड्या टाकू लागले. कुणी जळून मेले. कुणी बुडून मेले. मलिक महंमद सुभेदाराची दाणादाण उडाली. सारा हल्ला बुडाला ! हिरवे झेंडे सागरतळी पोहोचले ! जलदुर्गात कोळी नाचत होते. गर्जत होते. कोळणींच्या अंगी विजेचं बळ अन् चपळाई-संचारली. एकवीरा भवानीच्या पुढं कोळी अन् कोळणी थयथय नाचल्या. विजयाची रात्र त्यांनी धुंदावून गाजवली.

मालिक महंमद दुःखाने तोंड झाकून परत गेला.

जलदुर्गाधिपति राम कोळी डोळ्यांत तेल घालून आपली ही स्वतंत्र दर्यादौलत सांभाळीत होता. अरब, फिरंगी, हबशी वा चाचे मुरूडच्या जलदुर्गाकडे तिरप्या नजरेनेही पाहू शकत नव्हते.

पुढे राम कोळ्याची दोरी संपली ! मरण कुणाला चुकलंय ? राम कोळ्याने अखेरीस आपल्या जलदुर्गाची दौलत एतबारराव कोळ्याच्या ओंजळीत दिली. राम गेला !


एतराव कोळी असाच ताठर गडी होता. जलदुर्ग सांभाळीत होता.

निजामशाही दरबारात एकच दुखणं उरी खुपत होतं, जलदुर्ग मुरूड, जलदुर्ग मुरूड ! अहमदनगरच्या निजामशाहाच्या ताब्यात जवळ जवळ सारं उत्तर कोकण होतं. पण हे मुरूडचं बेट मात्र नव्हतं. ते सलत होतं. बादशाहा हे सल सारखं बोलून दाखवीत होता. पण हे अवघड वाण घेऊन मोहीमशीर व्हायला कुणीही धजत नव्हता.

पण एके दिवशी एका बहादुराने एकांतात बादशाहाला म्हटलं,

" मैं यह जंजीरा काबीज करूँगा ! "

बादशाहाने विस्मयाने त्या बहादुराकडे पाहिले. कानगोष्टी झाल्या. मनसुबा ठरला. हा बहादूर निघाला. अवघे तीनशे सवा तीनशे



आणि पेटारे आत जाऊ लागले.

काळेकभिन्न हबशी घेऊन ! या कानाचं त्या कानाला कळलं नाही. या बहादुराचं नाव होतं सिद्दी पेरीमखान.

अन् एका गढूळ सायंकाळी एतबारराव कोळी आपल्या जलदुर्गावर पाहणी-टेहेळणी करीत फिरत होता. वारं सुटलं होतं. सूर्य डुबला होता. अंधार चढत होता. दर्या जरा बेचैन होता. एवढ्यात एतबाररावाला उत्तरेकडे समिंदरात काही गलबतं येताना दिसली. त्याने न्याहाळलं. शिडं फुगारलेली गलबतं नक्कीच कुणा व्यापाऱ्याची असावीत हे त्याने हेरलं. सारे कोळी टवकारून पाहू लागले, तोच त्यातील एक छोटासा तारवा जलदुर्गाकडे येताना दिसला. तारव्यावरचा तांडेल इशारती करीत होता. शरणागतीच्या. कोळ्यांचे बाण थबकले.

तारवा जवळ आला. त्यातीला एक हबशी रुबाबदार व्यापारी आपला भरदार अंगरखा सावरीत जलदुर्गाच्या दरवाजात उतरला. त्याच्याबरो-बर दोन-तीन हबशी गुलाम नजराण्याची ताटं घेऊन उतरले. एतबार-

रावाने परवानगी दिली. हा व्यापारी एतबाररावाच्या महालात गेला. राव मोठ्या कुतूहलाने व संशयाने बघत होता. व्यापाऱ्याने आणलेला नजराणा रावास सादर केला. कुर्निसात करून अदबीने त्याने नजराण्यावरील रुमाल दूर केला. ताटात होते सोन्यामोत्याचे अलंकार आणि मद्याची सुरई ! व्यापारी म्हणाला,

" आम्ही सुरतेहून गोव्याकडे जाणारे व्यापारी आहोत. आज दर्या ठीक दिसत नाही. आजची रात्र आपल्या किल्ल्यात आम्हांला आश्रय द्यावा. उपकार होतील ! त्याबद्दल खंडणी देऊ. "

रावाची नजर सुरईवर गेली. राव भाळला. त्याने एक घोट घेतला. राव निहायत खूष झाला. त्याने एकदम परवानगी दिली. मात्र म्हणाला,

" किल्ल्याच्या बाहेरच तुमची माणसे गलबतावर असू द्या ! फक्त मौल्यवान् मालाचे पेटारेच जर सुरक्षिततेसाठी आत आणावयाचे असतील तर आणा. आम्ही परवानगी देतो. "

व्यापाऱ्याने कृतज्ञतेनें कुर्निसात केला.

गलबते किल्ल्याच्या दरवाजात आली. मोठमोठे पेटारे त्या व्यापाऱ्याने किल्ल्यात आणले. मद्याच्या सुरयाही आल्या ! रात्र चढली. सुरया रिकाम्या होऊ लागल्या. जलदुर्ग धुंद झाला. व्यापारी स्वत: आग्रह करून मद्य देत होता. कोळी पीत होते. एतबाररावाचा तोल केव्हाच गेला होता.

अन् तेवढ्यात व्यापाऱ्याने एकदम इशारत केली. आत आणलेले ते पेटारे एकदम खडाखड उघडले गेले. सपासप तरवारी उसळल्या अन् एकूण एकशे सतरा हबशी जवान त्या पेटाऱ्यांतून बाहेर पडले ! पापणी लवायचा अवकाश,त्यांनी एकदम त्या धुंद कोळ्यांवर हल्ला चढवला. एकच कल्लोळ उसळला. कत्तल उडू लागली. दरवाजा उघडला गेला. बाहेरच्या गलबतांतले हबशीही एकदम किल्ल्यात शिरले. एकच धुमाकूळ उडाला. रडारड, किंकाळ्या, आरोळ्या ! एतबारराव केव्हाच ठार झाला. कोळ्यांचे निशाण उडाले ! एकवीरा भग्न झाली ! जलदुर्ग बुडाला ! निजामशाही निशाण चढले. महाराष्ट्राची उरलेली अखेरची स्वतंत्र

[ पान ५६ वर ]

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

जून २२ ते २७ राशि-भविष्य

**मेष :** या वेळच्या ग्रहस्थितीचे महात्म्य असे आहे की, तुमच्या कर्तृत्वाकडे पाहून जगाचे डोळे दिपून जावेत. रवि-मंगळासह ४ ग्रह पराक्रमात. मला वाटते अशी सर्वोत्तम ग्रहस्थिती कित्येक वर्षांनंतर आजच आपण अनुभवीत आहात.

सहज काही केले आणि ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठले असा प्रत्यय याच काली यावा.

नोकरीधंद्यासाठी दूरचा प्रवास घडेल. आपले कर्तृत्व चौफेर उधळू लागेल. प्रगतीचे अनेक टप्पे ओलांडून आपण पुढे जाल. साडेसातीतसुद्धा असे काही अनन्य साधारण प्रगतीचे कालखंड येऊ शकतात. याचा प्रत्यय याच वेळी यावा.

दि. २५ ते २७ या काली सारे काही अपेक्षेप्रमाणे घडावे.

**वृषभ :** गेल्या आठवड्यापासूनच नव्या ध्येयधोरणाचा आपण पाठपुरावा करीत आहात. आणि या वेळी ते यशस्वी ठरल्याचा साक्षात्कार घडून यावा.

धनस्थानी जमलेल्या अनेक ग्रहांचे आपणास आवर्जून सांगणे आहे की, "या वेळी तुम्ही काहीही करा–अपेक्षेपेक्षाही अधिक यश द्यायला आम्ही कटिबद्ध आहोत."

या वेळचा सूर्य-गुरू लाभयोग, राजकीय प्रतिष्ठा वाढविण्यास मदत करील. नोकरीधंद्यात तर कधीही न मिळालेले यश देऊन जाईल.

साहित्य–विज्ञान क्षेत्रातही भरीव कार्य केले जाईल.

दि. २२, २३, २५ सर्वोत्तम यश देणारा काल.

**मिथुन :** व्याप आणि संताप हे तुमच्या पाचवीलाच पुजलेले दिसतात. संपूर्ण स्वास्थ्याचे दिवस क्वचितच अनुभवले असतील. या वेळी तर एक-दोन नव्हे चार उग्र ग्रहांचे संचलन तुमच्या राशीतून सुरू आहे.

समाधानाची गोष्ट एवढीच की, बुध, शुक्र तुम्हाला केव्हाही पैशाअडक्याची उणीव भासू देणार नाहीत.

उद्योगधंद्यात नव्या प्रभावी तंत्रमंत्रांचा अंगीकार केल्याशिवाय गत्यंतर नाही, याची आपणास जाणीव व्हायला लागेल. त्याचप्रमाणे अनेकांशी मिळते जुळते

घेतल्याशिवाय आपला निभाव लागणार नाही याची प्रकर्षाने जाणीव व्हायला लागेल.

चित्रपटक्षेत्रात कला-काव्य-साहित्याच्या प्रांतात काही भव्य दिव्य करून दाखविण्याची मनीषा याच वेळी तृप्त व्हावी. दि. २५ ते २८ जूनपासून सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

कर्क : वारे उलटच्या दिशेने वाहू लागल्याची जाणीव क्षणोक्षणी होऊ लागेल. व्ययस्थानच्या अनेक ग्रहांचा छळवाद पदोपदी सहन करावा लागेल. अगदी दारी चालून आलेली संधी माघारी फिरते की काय अशी भीती वाटू लागेल.

हितशत्रूंची कारस्थाने वाढू लागतील. खोट्यानाट्या आरोपांचे शितोडे उडू लागतील. प्रगतीचा मार्ग रोखण्याचा प्रयत्न अनेकांकडून केला जाण्याचा संभव दिसू लागेल.

दुर्दम्य आशावाद आणि निष्ठा यांवरच आता आपणांस विसंबून राहावे लागणार आहे. सहसा अपयश येणार नाही, पण बारीकसारीक यशासाठी प्राणपणाने झगडावे लागेल.

दि. २२, २३, २८ या काळी अपेक्षित यश पदरी पडावे.

सिंह : सिंहेचा गुरू आणि लाभस्थानातील ४ ग्रह ही अनन्यसाधारण ग्रहस्थिती पाहून विरोधक टरकतील. तुमच्या अनिर्बंध प्रगतीला रोखण्याची शामत कुणातच नाही.

अंदाजापेक्षाही मोठा लाभ आणि अपेक्षपेक्षाही अधिक प्रतिष्ठा लाभावी अशीच लाभस्थानच्या ग्रहांची इच्छा दिसते.

या वेळी आपण काहीही केलेत, कुठेही गेलात तरी तुमचे पाऊल पवित्र्यातच पडेल. या वेळी आपण आपल्या कार्याचा वेग वाढवायला हवा. कारण आजचे लाभातील ग्रह काही दिवसांनी व्ययात जातील आणि मग मात्र त्यांची लहर फिरेल. यासाठी त्यांच्या सहानुभूतीचा अधिकाधिक लाभ उठविण्याचा प्रयत्न करा.

दि. २५ ते २८ अनपेक्षित लाभाचा काल.

कन्या : शनी सप्तमातून अष्टमात गेला असला तरी त्याच्या या राश्यंतरामुळे तुमच्या परिस्थितीत फारसा फरक पडेल असे दिसत नाही. या वेळी रवि-मंगळ मात्र तुमच्यावर बेहद्द खूष आहेत. त्या समर्थ ग्रहांच्या हार्दिक सहकार्यामुळे तुम्ही कितीही अवघड गड चढून जाल. दशमातील ही चार ग्रहांची अभेद्य तटबंदी पाहून विरोधकांचे सारे प्रयत्न निष्प्रभ ठरतील.

ग्रहांनी अनुकूल कौल दिलाच आहे, प्रयत्नांची शिकस्त केलीत तर व्यावसायिक क्षेत्रातील तुमचे महत्त्व खूपच वाढीस लागेल. गुरू अनुकूल नाही याची मुळीच खंत बाळगू नका. यांत्रिक क्षेत्राशी तुमचा घनिष्ठ संबंध यावा.

दि. २५ ते २८ विशेष यश देणारा काल.

तूळ : या वेळची तुमची नेत्रदीपक ग्रहस्थिती पाहून तुमचे दैव हसू लागेल. भाग्यस्थानातील चतुर्ग्रही आणि लाभस्थानातील गुरू–म्हणजे मणिकांचन योगच.

सप्तमातील शनीची दखल घ्यायची गरजच नाही.

साहित्य आणि कला ही तुमची खास क्षेत्रे. त्या क्षेत्रात विक्रमी यश मिळवाल. दीर्घ मुदतीचे करारमदार कराल. अनेकांची सहानुभूती मिळवाल.

आगामी ८–१५ दिवसांत तुम्हा तूळ राशी व्यक्तींपैकी काहींना परदेशच्या दौऱ्यावर निघण्याची संधी लाभेल. या तुमच्या दौऱ्याने तुमचे पर्यायाने राष्ट्राचेही महत्त्व वाढीस लागेल. सुप्त अंगच्या स्तुत्य गुणांचा या कालापासून अधिकाधिक विकास व्हायला लागेल. सांपत्तिक लाभही फार मोठ्या प्रमाणावर होऊ लागेल.

दि. २५ ते २८ घाईगर्दीचे दिवस जातील.

वृश्चिक : सूर्यमंगळांची सहानुभूती गमावून बसल्यामुळे, परिस्थिती मोठी भयानक होणार आहे असे नव्हे. थोडाफार मानसिक ताण वाढेल, धावपळ, धडपड खूपच करावी लागेल इतकेच.

व्यावसायिक वातावरण काहीसे चिघळू लागेल. भागीदारांचे हार्दिक सहकार्य मिळेनासे होईल, आरोग्यही फारसे चांगले राहणार नाही. हा आठवा मंगळ काहींना काही व्यथा, विवंचना निर्माण करीतच राहील.

सामाजिक क्षेत्रात या काळी काही महत्त्वाची जबाबदारी स्वीकारू नका आणि व्यापारी उलाढाल्या टाळा.

अशा काळी काही न करण्यासारखा शहाणपणा नाही.

दि. २६, २७, २८ दूरचा प्रवास घडेल. बदली होण्याचीही शक्यता आहे.

धनू : सातव्या मंगळाचे आव्हान स्वीकारण्यात शहाणपणा नाही. कारण मंगळाच्या साहाय्याला आणखी रवि-शुक्रही आहेत. माघार घेणे किंवा शरणागती पत्करणे हाच एक उपाय.

कौटुंबिक स्वास्थ्य हरपेल. संघर्ष, मनभेद पदोपदी जाणवेल. व्यावसायिक वातावरणही दूषित बनेल. गुरू भाग्यस्थानी आहे. ठीक आहे तेवढाच एक आधार. सध्याच्या पेचप्रसंगातून मार्ग काढण्यास त्याचीच थोडीफार मदत होईल. वरिष्ठ नाराज बनतील, इष्टमित्रांची मने तुमच्या विरुद्ध कलुषित बनतील. वाढत्या खर्चाची विवंचना सतत जाणवत राहील.

दि. २५ ते २७ थोडाफार अनुकूल दिवस.

मकर : शनीचे चतुर्थस्थानी आगमन झालेले आहे, म्हणून सावधानतेचा इशारा देऊन ठेवत आहे. इतक्यातच त्याचा त्रास जाणवेल असे नव्हे पण या हटवादी ग्रहाची लहर केव्हा फिरेल कुणी सांगावे ?

रवि-मंगळ अनुकूल असल्यामुळे आगामी महिन्याभरात तरी तुम्हाला कुणाचीच भीती नाही.

सांपत्तिक ताण खूप बसेल, जबाबदारीचे ओझे वाढेल, अनंत कामे हातावेगळी करावी लागतील. पूर्वीसारखा निर्मळ स्वास्थ्याचा हा काळ नव्हे याची दखल घ्यावीच लागेल.

नोकरीधंद्यात प्रगतीकडे पावले पडतील, पण तुमची प्रगती पाहून हितशत्रूंच्या पोटात दुखायला लागेल. दि. २२ ते २४ हा काळ प्रगतीला पोषक जाणवेल.

**कुंभ :** अल्प काळ का होईना आपण साडेसातीतून मुक्त झाला आहात. शिवाय रवि-मंगळादी ग्रहही आपणास अनुकूल आहेत. एकदम मनावरील दडपण दूर झाल्या-प्रमाणे वाटेल, भंगलेल्या आशाआकांक्षा साधल्या जातील, हुकलेल्या संधी पुन्हा चालून येतील.

नोकरीधंद्यासाठी केलेले सारे प्रयत्न आता अपेक्षेबाहेर यशस्वी ठरू लागतील. हितशत्रूंची कारस्थाने त्यांच्याच अंगावर उलटतील.

शैक्षणिक क्षेत्रात—अर्थशास्त्रीय विभागात—संशोधन कार्यात महत्त्वपूर्ण कार्य करून दाखवाल. सांपत्तिक बाजूही पूर्वीइतकी दुबळी राहणार नाही.

दि. २५ ते २८ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**मीन :** चौथ्या मंगळाची डोकेदुखी अजूनही काही काल सहन करावी लागणारसे दिसते. समाधान एवढेच की, शनीचे तुमच्या राशीतून उच्चाटण झालेले आहे.

ऐन वेळी थोरामोठ्यांचे साहाय्य मिळेल, आणि आपला पेचप्रसंग सुटेल. या काली काही नवे विचार निर्माण होतील आणि ते कृतीत आणण्यासाठी अनेकांचे सहाय्य मागावे लागेल. पण प्रकृतीची विशेष काळजी घ्या. दूरच्या प्रवासाचे शक्यतो टाळा. थोडेसे धीराने घेतलेत तर अपेक्षेप्रमाणे सर्व काही घडेल.

दि २४ ते २७ जून या काली सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल. ○

# आत्मघात

[ पान ५२ वरून

भूमी परतंत्र झाली. हा व्यापारी होता, सिद्दी पेरीमखान !

सुलतानांनी इथं चिरेबंदी जंजिरा बांधला. त्याला नाव दिले, ' जंजिरे मेहरूब ! '

ही गोष्ट इ. १४९० मध्ये घडली. हा जंजिरा जिंकून घेण्यासाठी पुढे छत्रपती शिवाजीमहाराज, छत्रपती संभाजीमहाराज आणि श्रीमंत पेशवे यांनी वर्षन् वर्षे आकाशपाताळ केले. अेक पण यश कधीही आले नाही. समुद्रामुळे जंजिरा अजिक्यच राहिला. हा पुन्हा स्वराज्यात आला, इ. १९४७ साली !

राज्यकर्त्यांनी गाफीलपणाने एखादी चूक केली तर ती देशाला भोगावी लागते. पिढ्यान् पिढ्या, शतकानुशतके ! ! ○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd No. M H-649

# शिकार....

पहिल्या योजनेत शेकडा ५·८, दुसरीत शेकडा १०, तिसरीत शेकडा २५ आणि चौथ्या योजनेतही २५ शेकड्यांची परकीय मदत घेण्याचा सरकारचा निर्णय आहे. परकीय साहाय्य वाढत चालले आहे, पण उत्पन्न ? पहिल्या योजनेत १८ टक्के या हिशेबाने म्हणजे जवळजवळ शेकडा ४ इतके उत्पन्न वाढले. तिसऱ्या योजनेत ५ टक्क्यांनी राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. पण प्रत्यक्षात दोन-अडीच टक्क्यांनीच ते वाढले. जसजशी परदेशी मदत वाढते आहे तसतसे राष्ट्रीय उत्पन्न घटते आहे, ही गोष्ट आकडेवारीने सिद्ध झालेली आहे. याचे कारण काय ?

त्याचबरोबर खर्चाचा ताळमेळ मुळीच राहिलेला नाही. पहिल्या योजनेत ३ अब्ज रुपयांची तूट आली तर सांप्रत ६३ अब्ज रुपयांपर्यंत तूट वाढली आहे. देश स्वाश्रयी होण्याऐवजी आत्मप्रवंचनेची शिकार बनला आहे.

—डॉ. राममनोहर लोहिया

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.